सोलापूर
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०३ मे २०२४ | वर्ष दुसरे | अंक ४२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-




### गणपतीला गावी जायला कन्फर्म तिकिट मिळणार

मुंबई : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे बुकिंग १० मेपासून सुरू होत आहे. दरवर्षी, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे यासह मोठ्या शहरातील नागरिक गणपतीसाठी कोकणात दाखल होतात. यंदा गणरायाचे आगमन ७ सप्टेंबर रोजी होत आहे. त्यामुळं त्याच्या १२० दिवस आधीपासूनच म्हणजे १० मेपासून कोकणात जाणाऱ्या रेल्वे गाड्यांचे बुकिंग सुरू होणार आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची ७ मे रोजी अहमदनगरमध्ये सभा

अहमदनगर : भारतीय जनता पार्टी व महायुतीचे लोकसभेचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दिनांक ७ मे रोजी अहमदनगर शहरात येत असून सावेडी भागातील संत निरंकारी भवन जवळील मैदानात दुपारी ४ वाजता भव्य प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपा दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी दिली. या सभेच्या नियोजनासाठी महायुतीचे सर्व घटक पक्षाचे नेते व कार्यकर्ते जय्यत तयारी करीत असल्याचे भालसिंग यांनी सांगितले.

# निकालाच्या दिवशी दुपारी साडेबाराच्या आधी ४०० पारचं लक्ष्य पार करणार!

## भाजपा आणि एनडीए पूर्णपणे ट्रॅकवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा दावा



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे पार पडले असून वेगवेगळे दावे काँग्रेस आणि इंडिया आघाडीकडून केले जात आहेत. मात्र पहिल्या दोन टप्प्यांमध्येच आम्ही १०० हून जास्त जागांवर जिंकून आघाडी घेतली आहे. त्यामुळे ४०० पारचं लक्ष्य आम्हाला फार मोठे वाटत नाही. असा आत्मविश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला.

आमच्या समोर तुल्यबळ म्हणावा असा किंवा आमच्या तोलामोलाचा विरोधक नाही. त्यामुळे मतदानावर एक प्रकारचा परिणाम होतो आहे. आमच्या पक्षाने त्याचे तपशीलवार विश्लेषण केले आहे, असेही शाह यांनी सांगितले.

गाव, शहर, जंगल, वाळवंट, समुद्र किनारे किंवा शहरातले इतर भाग. पायाभूत सुविधांच्या बाबतीत खूप मोठी कामं होत आहेत. भारतीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांसाठी १० लाख कोटी रुपये खर्च करणं ही बाब सामान्य नाही. नरेंद्र मोदी यांनी १० वर्षांमध्ये जी कामं केली आहेत त्यामुळे देश पुढे जातो आहे. सुवर्णाक्षरांनी लिहावीत अशी ही दहा वर्षे आहेत. असेही अमित शाह म्हणाले. वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पहिल्या दोन टप्प्यांविषयी काय वाटतं आणि लोकसभा निवडणूक कशी सुरु आहे, असा प्रश्न विचारला असता याबाबत अमित शाह यांनी सविस्तर भूमिका मांडली.

भाजपा आणि एनडीए पूर्णपणे ट्रॅकवर आहे. ४ जूनच्या दिवशी म्हणजेच निकालाच्या दिवशी तुम्हाला दिसेल की दुपारी १२.३० च्या आधी एनडीए खासदार संख्या ४०० पार करणार. ४०० पारचं लक्ष्य आम्हाला मोठं वाटत नाही. ते सहज पार होईल. असा दावा अमित शाह (–ळीं डहरह) यांनी केला आहे.

नरेंद्र मोदी पंतप्रधान असल्यामुळे १३० कोटी भारतीयांमध्ये हा आत्मविश्वास दुणावला आहे की आपण जगात पहिल्या क्रमांकावर येऊ शकतो. रामजन्मभूमी, नवीन आर्थिक धोरण, कलम ३७० रद्द करणे, तिहेरी तलाक संपवणे, फौजदारी कायद्यांमध्ये करण्यात आलेले बदल या महत्त्वाच्या निर्णयांमुळे हे शक्य होणार आहे. तसेच कोरोना सारख्या महामारीशी आपल्या देशाने खूप उत्तम प्रकारे सामना केला. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वामुळेच हे शक्य झाले ही जनभावना आहे, असेही शाह म्हणाले.

# परिस्थितीनुसार निर्णय घेतल्याने मुंबईत तीन नवे उमेदवार : फडणवीस



मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे जागावाटप अखेर जाहीर झाले आहे. जागावाटपादरम्यान, महायुतीमधल्या भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत रस्सीखेच पाहायला मिळाली. अनेक बैठकांनंतर महायुतीतल्या शिंदे गटाला १५ जागा वाट्याला आल्या आहेत. दुसरीकडे भाजपनेही धक्कातंत्र वापरत मुंबईत विद्यमान खासदारांना डावलत नव्या उमेदवारांना संधी दिली आहे. याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थितीनुसार निर्णय घेतल्याचे म्हटले आहे.

मुंबईत पूनम महाजन, मनोज कोटक, गोपाळ शेट्टी या विद्यमान खासदारांचे तिकिट कापत भाजपने दुसऱ्याच उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. भाजपने मुंबई उत्तर मध्य मतदारसंघातून पूनम महाजन यांचे तिकीट कापत उज्वल निकम यांना उमेदवारी दिली. उत्तर मुंबईचे खासदार गोपाळ शेट्टी यांचे तिकिट कापत पियूष गोयल यांना उमेदवारी देण्यात आली. तर ईशान्य मुंबईत खासदार मनोज कोटक यांचा पत्ता कट करत मिहीर कोटेचा यांना संधी देण्यात आली. या निर्णयामुळे विद्यमान खासदारांना डावलून नव्या उमेदवारांना संधी दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु होती. त्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये भाष्य केले आहे.

मुंबईत भाजपने तीन उमेदवार का बदलले या प्रश्नाला उत्तर देताना देवेंद्र फडणवीसांना प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही सात, आठ उमेदवार बदलले आहे. त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार निर्णय करत असतो. अनेकवेळा लोकसभा लढणाऱ्यांना विधानसभा लढायला सांगितली जाते. विधानसभा लढणाऱ्यांना लोकसभा लढा म्हणतो. पक्षाची ही पद्धत आहे. ज्यांना आम्ही बदलले त्यांनी चुकीचे किंवा वाईट काम केले, असे आम्ही म्हणणार नाही. पण परिस्थिती प्रत्येक निवडणुकीत वेगळी असते. त्यावेळच्या परिस्थितीत कोण उमेदवार योग्य असेल, असा विचार करुन उमेदवार द्यावा लागत असल्याचे फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

राज्यात महायुतीचे जागावाटप झालेले आहे. आम्हाला मिळालेल्या जागांपैकी पालघरची जागा आम्हाला घोषित करायची आहे. आमची जागा आज किंवा उद्या घोषित होईल असेही फडणवीस म्हणाले. अजित पवार की एकनाथ शिंदे यापैकी कोणाची मनधरणी करण्यात वेळ गेला, असे विचारले असता फडणवीसांनी मिश्किल प्रतिक्रिया दिली. ठाणे आणि दक्षिण मुंबई आम्हाला हवी होती. पण त्यांची भूमिका होती की वर्षानुवर्षे या जागा त्यांच्या आहेत. आमचेही काही युक्तिवाद होते. चर्चा झाल्यानंतर जो निर्णय झालाय, त्यासाठी आम्ही बांधिल आहोत. त्यामुळे फार कोणाला मनवायला लागले नाही. पण बैठका आम्ही बऱ्यापैकी केल्या. युक्तीवाद केले, पण निर्णय मात्र एकमताने घेतला, असे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

# लव्ह जिहाद, भू जिहादनंतर आता व्होट जिहाद

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काँग्रेसवर टीका

आणंद (गुजरात) : आपण 'लव जिहाद', 'भू जिहाद' याबाबत ऐकले आहे. मात्र, आता इंडिया आघाडीच्या नेत्यांनी 'व्होट जिहाद' करण्याचे आदेश दिले आहेत. हे लोक मुस्लिमांना एकत्र येऊन भाजपाविरोधात 'व्होट जिहाद' करण्यास सांगत आहेत, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसह इंडिया आघाडीच्या नेत्यांवर केला. ते गुजरातच्या आणंद येथील प्रचारसभेत बोलत होते.

पंतप्रधान म्हणाले की, विरोधी आघाडीचा हेतू धोकादायक आहे. मोदी म्हणाले की, सर्व मुस्लिमांनी एकत्र येऊन मतदान करावे, असे इंडिया आघाडी म्हणत आहे. यासाठी मोदी यांनी काँग्रेस नेते सलमान खुर्शीद यांची भाची आणि समाजवादी पक्षाच्या नेत्या मारिया



आलम खान यांच्या भाषणाचा संदर्भ दिला, ज्यात त्या मुस्लिमांना 'व्होट जिहाद'साठी आवाहन करत होत्या. दुर्दैवं म्हणजे व्होट जिहाद करण्याचे आवाहन एका शिकलेल्या मुस्लीम घराण्यातील नेत्याने केले आहे. या घराण्यातील सदस्य काँग्रेसमध्ये मोठ्या पदावर आहेत, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

जिहाद म्हणजे काय आणि तो कोणाविरोधात केला जातो, हे सर्वांना माहिती आहे. तरीही इंडिया आघाडीचे नेते मुस्लिमांना एकत्र येऊन व्होट जिहाद करण्यास सांगत आहेत. व्होट जिहाद करा, अस सांगत इंडिया आघाडीने लोकशाहीचा अपमान केला आहे. विशेष म्हणजे काँग्रेसच्या एकाही नेत्याने याचा विरोध केला नाही, व्होट जिहादचे आवाहन करत काँग्रेसकडून तुष्टीकरणाचे राजकारण केलं जात आहे, असेही ते म्हणाले. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच पाकिस्तानचे नेते फवाद हुसैन यांनी राहुल गांधी यांचं कौतुक करणारी पोस्ट एक्स या समाजमाध्यमावर केली होती. यावरूनही पंतप्रधान मोदींनी काँग्रेसला लक्ष्य केलं.

# दिल्ली महिला आयोगाच्या २२३ महिला कर्मचाऱ्यांचं निलंबन!

## आयोगाच्या माजी अध्यक्षांवर गंभीर आरोप करत राज्यपालांनी दिले निलंबनाचे आदेश

नवी दिल्ली : दिल्लीच्या महिला आयोगातून एक मोठी बातमी समोर आली आहे. महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा स्वाती मालीवाल यांच्यावर गंभीर आरोप करत दिल्लीचे राज्यपाल व्ही.के.सक्सेना यांनी महिला आयोगाच्या २२३ महिला कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. नियुक्ती प्रक्रियेत अनियमितता असल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

माजी अध्यक्षा स्वाती मालीवाल यांच्या कार्यकाळात त्यांनी २२३ महिलांची नियुक्ती नियमांच्या विरोधात जाऊन परवानगी न घेता केली होती, असा आरोप करण्यात आला. त्यानंतर नायब राज्यपालांनी २०१७ मध्ये महिला आयोगाच्या बेकायदेशीर नियुक्ती आणि अनियमिततेच्या मुद्द्यांची तपासणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली.

समितीने २ जून २०१७ रोजी अहवाल सादर केला. या अहवालानुसार, ठरवून दिलेल्या प्रक्रियेचे पालन न केल्यामुळे आणि नायब राज्यपालांचीही मंजुरी न घेतल्यामुळे निर्माण केलेली २२३ पदे आणि महिला आयोगाद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती अनियमित होती. त्यामुळे दिल्ली महिला आयोगाने डीसीडब्ल्यू नियम तरतुदींचे उल्लंघन केले, असा आरोप करण्यात आला.

डीसीडब्ल्यूने केलेल्या या सर्व अनियमितता आणि बेकायदेशीरतेची दखल घेऊन नायब राज्यपालांनी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या मंजूर पदांशिवाय आणि योग्य प्रक्रियेचे पालन न केल्याने रद्दबात ठरवले.

### ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचा शिवसेना महायुतीचे उमेदवार संदिपान भुमरे यांना पाठिंबा



छत्रपती संभाजी नगर – ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीचे कमांडर, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक राऊत यांच्या आदेशानुसार तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व एझड ९५ राष्ट्रीय संघर्ष समिती पदाधिकारी यांच्या सुचणे नुसार शिवसेना, भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस, महाराष्ट्र नव निर्माण सेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), राष्ट्रीय समाज पक्ष, पीपल्स रिपब्लिकन पार्टी (कवाडे गट) महायुतीचे उमेदवार संदिपान भूमरे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. यासंदर्भात त्यांनी प्रसिद्धी पत्र काढले. त्यात म्हटले, की महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनी आपल्या पेन्शन वाढीच्या मागणीसाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आम्ही त्यांना पाठींबा देण्याचे ठरवले असल्याचे सांगण्यात आले.

## भाग ०४ सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड

# निकष डावलल्याने रोपांची हेळसांड, देखरेख कागदोपत्री







**तभा वृत्तसेवा/सहयोग प्र.जावळे**

कन्नड, दि.०३ मे – राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व वृक्ष लागवड करणारे खाजगी कंत्राटदार यांच्या मिलीभगत मुळे धुळे सोलापूर महामार्गालगत वृक्ष लागवडीचा बोजवारा उडाला आहे.कन्नड परिसरात या महामार्गालगत वृक्षांचा वैभवशाली इतिहास पुसला गेला.आणि आता लावलेले रोपांची निकषांनुसार काळजी न घेतल्याने, कागदावरील देखरेखी मुळे पुन्हा या रस्त्याला जुने वैभव प्राप्त होणे अशक्य वाटते.

तेलवडी ते कारोडी दरम्यान ५५ किलोमिटर अंतरात या महामार्गावर मध्यभागी व दुतर्फा ५८ हजार रोपे लावण्यात आली. सदर कंत्राट तब्बल दोन कोटी रुपयांचा आहे.

निकषांनुसार लागवड करतांना रोपांची उंची दोन मीटर अर्थात सुमारे साडेसहा फूट असायला हवी.म्हणजे सुमारे तीन वर्षांपूर्वी रस्त्याच्या दुतर्फा लागवड केलेले रोपांची उंची आता १५ ते २० फूट असायला हवी होती,मात्र प्रत्यक्षात हे झाडे अजूनही जमिनीवर रेंगळतांना दिसतात.रस्त्याच्या मधले व दुतर्फा सुमारे पन्नास टक्के झाडे गायब झालेले आहेत.अर्थात कंत्राट संपेपर्यंत बाद रोपे लावणे कंत्राटदाराला अनिवार्य आहे.मात्र बाद रोपे लावल्याचे प्रत्यक्षात दिसत नाही.महामार्ग प्राधिकरणाच्या म्हणण्यानुसार त्यांच्याकडे बॅकअप प्लॅन आहे,त्यानुसार बाद झाडे लावण्यासाठी त्यांच्या नर्सरित हजार ते दोन हजार झाडे आहेत,पण मग अजूनही बाद झाडे का दिसून येतात, व तेही इतक्या मोठ्या संख्येने,हा मुख्य प्रश्न आहे.

सुरक्षा जाळी नाही:-

इंडियन रोड काँग्रेस यांनी दिलेल्या निकषांमध्ये रस्त्याच्या दुतर्फा झाडांना सुरक्षा जाळी बसविण्याचे सांगितले आहे.मात्र या महामार्गावरील दुतर्फा झाडांना एकाही ठिकाणी सुरक्षा जाळी, ट्री गार्ड बसवलेले नाही. करोडी ते तेलवाडी च्या पुढे चाळीसगाव धुळे कडे नुकताच बांधकाम सुरू झालेल्या रस्त्यालगत दुतर्फा लावलेल्या प्रत्येक झाडांना प्लास्टिक सुरक्षा जाळी लावण्यात आली आहे.मग एकच महामार्गावर दोन ठिकाणी वेगवेगळे नियम का? याही भागात सुरक्षा जाळी बसवणे आवश्यक आहे.

> **झाडांना संरक्षण जाळ्या लावण्यात आलेल्या होत्या पण काही जाळ्या चोरी झाल्या,सर्व झाडांना मुबलक पाणी देण्यात येत आहे,झाडे संगोपनसाठी आम्ही शक्य तेवढ्या बाबींचा विचार करून काम करत आहोत**
>
> **रवींद्र इंगोले**
> **प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग**

कागदावरील देखरेख:-

निकषांनुसार झाडांच्या लागवडी वेळी खड्ड्यात काळी माती,कंपोस्ट खत,शेण खत टाकण्याची तरतूद आहे.मात्र सदर रोपे लावताना काळी माती,खते टाकतांना दिसून आले नसल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले आहे.पावसाळ्यात रस्त्याच्या मध्ये असलेले शोभिवंत झाडांच्या वर पर्यंत गवत वाढलेले असते,वेळेवर या शोभिवंत झाडांची कटिंग न केल्याने त्यांच्या फांद्या रस्त्यावर येवून अपघाताचा धोका वाढतो.उन्हाळ्यात वेळोवेळी पाणी पुरवठा न केल्याने निम्म्यापेक्षा जास्त झाडे जळून गेले आहेत.

निकषांनुसार देखरेख केली असती तर या महामार्गाला जुने वैभव नक्कीच प्राप्त झाले असते.सध्याच्या झाडांची परिस्थितीवरून सदर देखरेख कागदोपत्री असल्याचे दिसून येते.या परिसरात रोपे लागवड पासून आज पर्यंत त्या परिसरातील प्रत्यक्षदर्शी शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया व सविस्तर माहिती पुढील लेखात

क्रमशः..

### क्रिकेटर सुरेश रैनाच्या भावासह आणखी एकाचा रस्ते अपघातात मृत्यू

शिमला : भारतीय क्रिकेट संघाचा आणि चेन्नई सुपर किंग्सचा माजी खेळाडू सुरेश रैनावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कालच सुरेश रैनाने परळ येथील बाजराला भेट देऊन जांभूळ खरेदी केले होते. त्याचा हा व्हिडीओ व्हायरल होत असतानाच त्याच्या कुटुंबात एक दुखःद घटना घडली आहे. सुरेश रैनाच्या चुलत भावासह दोन जणांना रस्ता अपघातात जीव गमवावा लागला आहे. ही 'हिट अँड रन'ची केस असल्याचे गग्गल पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिमाचल प्रदेशच्या कांगडा जिल्ह्यात काल रात्री हा अपघात झाला. सुरेश रैनाचा चुलत भाऊ सौरव कुमार रात्री जवळपास पावणेअकरा वाजेपर्यंत दुकानात काम करत होता. दुकान बंद करुन घरी जात असताना अपघाताची घटना घडली. अपघातानंतर आरोपी पळून गेला, मात्र पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला बाजारपेठेतून पकडले. टॅक्सी आणि स्कूटरमध्ये हा अपघात झाला.



## संक्षिप्त वृत्त...

### अशोक धबडगे सेवानिवृत्त

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयातील क्षेत्र कर्मचारी अशोक राणोजी धबडगे (मानवतकर) हे नियत वयोमानानूसार मंगळवारी (दि.३०) सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल त्यांचा कार्यालयात निरोप देवून सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रुपेश धमगुंडे, सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी पिंगळीकर, आरोग्य पर्यवेक्षक सातपुते, आरोग्य निरीक्षक चव्हाण, कासापुरीकर, मकरंद, जाधव, जुकटे, जाफर पटेल, डोंगरे, श्रीमती लाठे, अमोल बनसोड आदी उपस्थित होते.

### पूर्णेत युवकाचा दोघांवर गोळीबार

**परभणी,/प्रतिनिधी:** पूर्णा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरात सोमवारी सायंकाळी ४.३० वाजेच्या सुमारास दोघा युवकांवर शुल्लक कारणातून गोळीबार करणाऱ्या तरुणास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले.

आंबेडकर नगरातील सचिन संजय मगरे व प्रविण कनकुटे हे दोघे अन्य मित्रांबरोबर गप्पा गोष्टीत दंग होते. त्यावेळी गौरव कैलास खंदारे हा या युवकांजवळ आला. त्याने तुम्ही फार माजला आहात, असे म्हणत क्षणार्धात पिस्तूल काढून सचिन मगरे यांच्या दिशेने गोळी झाडली. मगरे यांनी सतर्कता दाखवून गोळी हुकवली. त्या पाठोपाठ खंदारे याने खंजीरने वार करण्याचा प्रयत्न केला. परंतु, तोही दोघांनी चुकवला.

दरम्यान, या खळबळजनक घटनेबद्दल दोघा मित्रांनी पूर्णा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पूर्णा पोलिसांनी सोमवारी रात्री फुले नगरातील खंदारे यास गुन्हा दाखल करुन ताब्यात घेतले.

### धीरज चारण यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील अधिक्षक या पदावर कार्यरत असणारे धीरज पन्नालालजी चारण यांचे मंगळवारी (दि.३०) निधन झाले. मृत्यू समयी ते ५७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, वडील, भाऊ असा मोठा परिवार आहे. दरम्यान, चारण यांच्या पार्थीवावर जिंतूर रस्त्यावरील वैकुंठधाम स्मशानभूमीत सायंकाळी ७ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी सरफराज नगर येथून अंत्ययात्रा काढण्यात आली.

### औरंगाबाद-कल्याण विशेष गाडी रद्द

**परभणी,/प्रतिनिधी:** नांदेड-पनवेल-नांदेड मार्गे औरंगाबाद-कल्याण विशेष गाडी दक्षिण मध्य रेल्वे विभागाने प्रवाशांअभावी रद्द केली आहे.

उन्हाळी सुट्यात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेने गाडी क्रमांक ०७६२५ /०७६२६ हुजूर साहिब नांदेड-पनवेल-हुजूर साहिब नांदेड मार्गे औरंगाबाद-कल्याण विशेष गाडीच्या ४० फेऱ्या मंजूर केल्या होत्या. परंतु या गाडीस प्रवाशांचा प्रतिसाद अल्प प्रमाणात मिळाल्यामुळे ही गाडी तात्काळ प्रभावाने पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वे विभागाच्या नांदेड येथील जनसंपर्क विभागाने दिली आहे.

### १५ बटूूवर उपनयन संस्कार

**परभणी,/प्रतिनिधी:** राष्ट्रगुरु समर्थ रामदास स्वामी साहित्य अभ्यास मंडळ परभणीच्या वतीने जूना पेडगाव रोडवरील अन्नपूर्णा मंगल कार्यालयात सोमवारी (दि.२९) सकाळी ११.३० वाजता दोन टप्प्यात सर्व शाखीय सामूहीक १५ बटूंवर उपनयन संस्कार करण्यात आले.

यावेळी हभप माधवबुवा आजेगावकर, प्रभाकर गुरुजी नित्रूडकर, नाथवंशज जागृतीताई जहागिरदार, कांता गुरुजी साळापुरीकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

संजय जोशी वझुरकर, मनोहर बोरवंडकर, सुरेश जामकर, महेंद्र लोणारकर, भरत उपाध्ये, चैतन्य भेंडाळकर, विशाल सातोनकर आदी मान्यवरांनी या उपनयनसंस्कार सोहळ्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### गंगाखेडात सामाजिक संघटनांनी नोंदविला निषेध

**परभणी,/प्रतिनिधी:** गंगाखेड शहरातील संत जनाबाई नगरातील १९ वर्षीय युवतीस अश्लिल व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवून आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या निषेधार्थ गंगाखेडच्या सामाजिक संघटनांनी रविवारी (दि.२८) येथील व्यंकटेश विद्यालयात आयोजित केलेल्या श्रध्दांजली सभेतून तीव्र निषेध व्यक्त केला.

या प्रकरणात गंगाखेडातील महिला दक्षता समिती, सवंगडी कट्टा सामाजिक समूह, व्यापारी महासंघ, लायन्स क्लब गोल्ड सिटी, लायन्स क्लब टाऊन, साई सेवा प्रतिष्ठान, लोक जनशक्ती, संघर्ष प्रतिष्ठान, गोदावरी स्वच्छता अभियान, पतंजली योग समिती, डीकेसी ट्रस्ट, नाभिक महामंडळ, रक्षक फाऊंडेशन, रुद्राक्ष मित्र मंडळ, स्वामी विवेकानंद मित्र मंडळ, मन्मथ सेवा ट्रस्ट, गंगाखेड तालुका पत्रकार संघ आदी संघटनांच्या वतीने रविवारी पोलिस प्रशासनास निवेदन सादर करण्यात आले. यावेळी बाळासाहेब राखे, दगडूसेठ सोमानी गोविंद यादव, मनोज नाव्हेकर, माधुरी बंटीराजे राजेंद्र, संजय अनावडे, भगत सुरवसे, ॲड. राजू देशमुख, महेश साळापूरीकर, संगीता गाडगे, राजेश जाधव, संदीप कोटलवार, गजानन दिवाण, उमेश पापडू, नारायण घनवटे, अमोल दिवाण, सुनील कोनार्डे, शशी धोंडरकर, इसाक अन्सारी आदी उपस्थित होते. या शिष्टमंडळाने संबंधित आरोपींविरोधात कठोर कारवाई करावी, मुख्य आरोपीस तात्काळ अटक करावी, अशी जोरदार मागणी केली. पोलिस प्रशासनाने या शिष्टमंडळास कारवाईचे आश्वासन दिले.

दरम्यान, जनाबाई नगरातील एका १९ वर्षीय युवतीस सचिन हजारे नामक युवकाने तुझे अश्लिल फोटो माझ्याकडे आहेत, ते जर सोशल मिडीयावर व्हायरल करायचे नसतील तर दोन लाख रुपये दे असे नमूद करीत धमकावले. मुलीसह पालकांनी आपल्याकडे पैसे नाहीत, तू व्हिडीओ असेल तर डिलीट कर, असे म्हटले, तेव्हा सचिन हजारे व पत्नी निर्मला हजारे या दोघांनी या कुटूंबियांना शिवीगाळ केली. या प्रकाराने संबंधित युवतीने सर्व कुटूंबिय झोपेत असतांना गुरुवारी पहाटे गळफास घेवून आत्महत्या केली. या प्रकरणात संबंधित युवतीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे प्रथम आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. परंतु, पित्यासह अन्य नातेवाईकांनी कठोर भूमिका घेतल्यानंतर तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला व सचिन हजारे, निर्मला हजारे या दोघांना पोलिसांनी अटक केली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# बोगस निविष्ठा विक्री करणाऱ्या कृषि केंद्रावर कडक कारवाई करावी - जिल्हाधिकारी गावडे

**परभणी,/प्रतिनिधी :** खरीप हंगामात शेतक-यांना बोगस निविष्ठा विक्री करणाऱ्या कृषि केंद्रांवर कृषि विभागाच्या भरारी पथकांनी आकस्मिक तपासणी करून बोगस बि-बियाणे, खते, किटकनाशके विक्रेत्यांवर कडक कारवाई करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम सन २०२४ जिल्हास्तरीय आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजित करण्यात आली होती त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. गावडे बोलत होते.

यावेळी निवासी जिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी , उप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप घोन्सीकर, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अनिल गवळी, आत्माचे प्रकल्प संचालक डी.एस.चव्हाण, उपविभागीय कृषि अधिकारी आर.बी.हरणे यांच्यासह जिल्हा यंत्रणेचे संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. त्यामुळे बोगस बियाणे विक्री करणे, शेतकऱ्यांना आवश्यकतेपेक्षा जास्त निविष्ठा खरेदी करण्यास भाग पाडले जाते. कृषि केंद्रांवर असलेला बि-बियाणे, खतांचा साठा, झालेली विक्री आणि शिल्लक याबाबतचा मोठा फलक दर्शनीय भागात लावण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी यावेळी यंत्रणेला दिल्या.

मागील वर्षी राज्यातील पर्जन्यमान कमी झाला असल्याने सद्या पाणी आणि चारा टंचाईची शक्यता



निर्माण होण्याची शक्यता आहे. येणारा दीड महिन्याचा कालावधी अत्यंत कठीण असल्याने पाणी आणि जनावरांसाठी चाऱ्याचे नियोजन करावे.

हवामान विभागाने यंदा पाऊस चांगला होणार असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे कृषि विभागाने खरीप पेरणी संदर्भात उत्कृष्ट बियाणे, त्याची उगवणक्षमता, पुरेसा पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना श्री. गावडे यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्यात कापूस, तूर, सोयाबीन आदी प्रमुख पिकांसह मूग, उडदाखालील क्षेत्रांचाही त्यांनी आढावा घेतला. प्रधानमंत्री पीक विमा योजना, फळबाग लागवड योजना, रेशीम लागवड, वीज जोडणी, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना, शेततळे, महात्मा गांधी रोजगार हमी योजना आणि नरेगाच्या माध्यमातून होणाऱ्या कामांचा आढावा यावेळी जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी घेतला.

केंद्र व राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण, प्रधानमंत्री पिक विमा योजना, हवामान आधारित फळपिक विमा योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, फळबाग लागवड, प्रधानमंत्री कृषि सूक्ष्म सिंचन योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रमांर्गत येणाऱ्या योजना, नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्प (पोकरा) आदींचा यावेळी आढावा घेतला.

तुती लागवडीखालील क्षेत्र वाढवावे, वीजजोडणी वेळेत देण्यात यावी, फळबाग लागवड योजना राबवावी, उत्कष्ट कृषि निविष्ठांचा पुरवठा करावा आणि पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कृषि केंद्रचालकांवर कारवाई करण्याचे निर्देश ही जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी यावेळी यंत्रणेला दिले. बैठकीस यावेळी संबधित सर्व विभाग प्रमुख, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

### नरवाडी येथे दोन चिमुरडयांचा पात्रात बूडुन अंत

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ तालुक्यातील मौजे नरवाडी येथे एका शेतकऱ्याच्या शेततळ्यात पोहायला गेलेल्या दोन चिमकल्यांचा पाण्यात बडून मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी ११ च्या दरम्यान घडली आहे.या घटनेमुळे तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सोनपेठ तालुक्यात सद्या उन्हाची तीव्रता वाढली असल्यामुळे अंगाची लाही लाही होत आहे. उन्हाच्या उकाड्यापासून बचाव करण्यासाठी नागरीक धडपडत आहेत. अशावेळी छत्रपती संभाजी नगरहुन नरवाडी येथील आत्या च्या गावी उन्हाळ्याच्या सुट्टीत आलेला स्वप्निल महेश बनसोडे (वय ९ वर्षे) व नरवाडी गावातील सम्यक राजेंद्र वाघमारे (वय ६ वर्षे) हे दोन चिमुकले मंगळवार दि.३० रोजी सकाळी गावा शेजारी असलेल्या शेतातील शेततळ्यात पोहायला गेले होते. शेततळ्यातील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे त्या दोघांचा पाण्यात बुडुन मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. त्यावेळी आजुबाजुला असलेल्या दोन युवकांनी पाण्यात बुडालेल्या बालकांना तळ्यातून बाहेर काढले.या घटनेची माहिती मिळताच सोनपेठ चे पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव ऊन दोन्ही बालकांना सोनपेठ येथील ग्रामीण रुणालयात दाखल केले.

## एचआरसीव्दारे पाच शाळांना ९० पुस्तकांची वाचनपेटी भेट

**परभणी/प्रतिनिधी-** उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थी नवनवीन गोष्टी शिकत असतात, मित्रांशी गट्टी करत मौजमजा लुटत असतात, दंगामस्ती करत असतात, पुस्तकासारखा नवा मित्र जोडून पुस्तकांशी मैत्री करावी म्हणून होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज (एच.ए.आर.सी) संस्थेकडून गंगाखेड तालुक्यातील शाळांना प्रत्येकी ९० पुस्तक रुपी पुस्तकांची आनंदी वाचन पेटी भेट देण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून एचआरसी संस्थेचे संस्थापक पवन चांडक तर प्रमुख अतिथी म्हणून त्वचारोग तज्ञ डॉ. दिनेश भुतडा, डॉ. शैलेश कदम व समाजसेविका माया औसेकर हे उपस्थित होते. सर्वांचे संस्थेतर्फे पुस्तक व निसर्गप्रेमी जयश्री औताडे व ज्ञानेश्वरी लटपटे यांच्याकडून एक एक रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना एचएआरसी संस्थेच्या गंगाखेड तालुका समन्वयिका जि.प. केंद्रीय कन्या शाळेच्या जयश्री औताडे यांनी हा अभिनव उपक्रम आणि सुट्टीच्या दोन महिन्यात असणाऱ्या स्पर्धेची रूपरेषा आणि राबविण्यामागील हेतू स्पष्ट केला.

समाजसेविका माया औसेकर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजवण्याचे व आत्मविश्वास निर्माण करण्याचे हे कार्य करताना अनेक मदतीचे हात हातभार लावत असल्याचे पवन चांडक यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याची सुट्टी पुस्तकांशी गट्टी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेण्याबद्दल सांगितले. केवळ जिल्हा परिषद चे विद्यार्थी स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ शकतील असे नाही तर स्वयंस्फूर्त खाजगी संस्था देखील या वाचन स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवू शकतात, असे आवाहन पवन चांडक यांनी केले.

गंगाखेड तालुक्यातील कस्तुरबा गांधी विद्यालय (गंगाखेड), जि. प. केंद्रीय प्रा. शाळा इसाद, जि. प. प्रा.शाळा सूनेगाव, जि. प. प्रा. शाळा गोदावरी तांडा व जि. प. गोविंदवाडी व महातपुरी या पाच जिल्हा परिषद शाळांना एचएआरसी संस्थेच्या टीमने आनंदी वाचन पेटी सुपूर्द केली. या वाचन पेटीमध्ये ९० पुस्तकांचा खजिना असून पेटीमध्ये कथासंग्रह, कवितासंग्रह, महापुरुषांची, शास्त्रज्ञांची चरित्रे उपलब्ध आहेत. तसेच जि. प. केंद्रीय कन्या प्रा.शाळा, दत्तमंदिर व जि.प. प्रा. शा. शिवाजी नगर तांडा शाळेला प्रत्येकी २५ पुस्तकांची वाचनपेटी भेट देण्यात आली.

दरम्यान, आतापर्यंत परभणी हिंगोली व जालना जिल्ह्यामधील ७२ शाळांना ही आनंदी वाचन पेटी भेट देण्यात आली आहे.

### डासाळा येथे भिमगितांचा कार्यक्रम संपन्न -जानू विना रंगच नाय फेम राणी मस्के

**सेलू,/प्रतिनिधी:** तालूक्यातील डासाळा(रामनगर) येथे डॉं.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जानू विना रंगच नाय फेम राणी मस्के यांच्या बहारदार जल्लोश भिमगीतांचा कार्यक्रम मंगळवार ३० रोजी संपन्न झाला.यावेळी उद्घाटक साईराज बोराडे,जयसिंग शेळके,रामभाऊ वाघ यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी आयोजक सूनिल हिवाळे, दिलीप आकात,भिमराज गोटे,बालकिशन साळवे,शूभम कदम आदींची उपस्थिती होती.यावेळी सूप्रसिद्ध गायीका राणी मस्के यांनी बहारदार सादरिकरण करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती कमिटी अध्यक्ष अनिल हिवाळे,उपाध्यक्ष बाळु भाले, सचिव गौतम पारवे, प्रभाकर घोडे, नामदेव गवारे, लतीफ



सय्यद, दिपक खंदारे, शिवाजी घोडे, शिवाजी कांबळे, आदींनी पूढाकार घेतला.

## मानवतरोड रेल्वे स्टेशनवर पिण्याच्या थंडगार पाण्यासाठी आणिबाणी;तहसिल प्रशासन यांना निवेदन

**मानवत/प्रतिनिधी-** दिनांक २४ एप्रील रोजी मानवत तहसिलचे कर्तव्यदक्ष तहसिलदार यांच्या माध्यमातून करणी सेनेच्या वतीने मानवतरोड रेल्वे स्टेशनचे स्टेशन मास्तर यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनात मानवत रोड रेल्वे स्टेशन वरील नळाला तुट्या बसवुन थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यास आदेशीत करावे अशी विनंती करणी सेनेचे युवा तालूका अध्यक्ष राम दहे पाटील यांनी केली आहे.

सध्या वातावरणात बदल झाला असुन आकाशात सूर्य आग ओकत आहे. तर दिवसोनदिवस तापमानात वाढ होत आहे. ऐन कडक उन्हाळ्याचे दिवस असुन उन्हाचा पारा वाढतच आहे. त्यामुळे मानवतरोड रेल्वे स्टेशनवरील नळाला एकही तोट्टी नाही. त्यामुळे रेल्वे प्रवाशांसह सामान्य नागरीकांना ऐन उन्हाळ्यात थंडगार पिण्याचे पाणी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे अशी विनंतीः मानवतरोड रेल्वे स्टेशनवर साई भक्त पाथरी येथे साईबाबांच्या जन्मस्थळी दर्शनाला येतात पण मानवतरोड रेल्वे स्टेशनवर थंडगार पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने सामान्य नागरीकांसह साईभक्तांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी रेल्वे प्रशासनास आदेशीत करावे. त्याकरीता आपल्या स्तरावर करणी सेनेच्या वतीने या निवेदनाद्वारे मागणी करण्यात येत आहे. आठ दिवसाच्या



आत नळाला तुट्या बसवुन थंडगार पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे न उपलब्ध करुन दिल्यास रेल्वे प्रवाशांसह करणी सेनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. आंदोलन काळात काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास आपले लोक कल्याणकारी प्रशासन जवाबदार राहील असा ईशारा यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात करणी सेनेचे युवा तालूकाध्यक्ष राम पंडितराव दहे पाटील यांनी दिला आहे.

# पूर्णेतील मॉकड्रील ठरली लक्षवेधी; आपत्कालीन परिस्थितीची प्रात्यक्षीके

## नागरिकांची विशेष उपस्थिती, प्रात्यक्षीके पाहून अधिकारी व कर्मचारी यांना कामाच्या विशेष सुचना

**परभणी/प्रतिनिधी-** रेल्वेगाडीस अपघात होवून एक डब्बा दुसऱ्या डब्यावर चढल्याचे तर एका डब्याने पेट घेतल्याचे दृश्य दिसल्याबरोबर उद्भवलेल्या आपत्कालीन स्थितीचा पूर्णा रेल्वेस्थानकावर मंगळवारी (दि.३०) सकाळी भोंगा वाजला अन् क्षणार्धात अग्निशामक दलासह आरोग्य, पोलिस आणि रेल्वे प्रशासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सतर्कता दाखवून घटनास्थळी धाव घेतली. बचाव कार्य सुरु केले. तो प्रकार मॉकड्रील असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या पथकाबरोबर उसळलेल्या बघ्यांच्या गर्दीने सुटकेचा निःश्वास सोडला.

दक्षिण मध्य रेल्वे विभागाच्या नांदेड विभागाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) व राज्य सरकारच्या अग्निशामक, आरोग्य, पोलिस व प्रशासकीय विभागाद्वारे आपत्कालीन स्थितीत कितपत सतर्कता दाखवली जाईल व बचाव कार्यात संयुक्त प्रयत्नातून कितपत तत्परतेने मदतीचा हात दिला जाईल, याची चाचणी करण्याकरीता मंगळवारी सकाळी ९.३६ वाजता पूर्णा रेल्वे स्थानकावर मॉकड्रीलचा संकल्प सोडला. तत्पूर्वी या विभागाने लोको यार्ड मधील रेल्वे गाडीचा डब्बा दुसऱ्या डब्यावर चढविल्याचे व एका डब्बा घसरल्याचे तर एका डब्याला आग लागल्याचे दृश्य उभे केले व या रेल्वे गाडीस मोठा अपघात झाल्याचे भासवून आपत्कालीन स्थितीत रेल्वेस्थानकावर वाजणारा कर्णकर्कश्शय भोंगा वाजवला. ९.३६ वाजता तो भोंगा वाजल्याबरोबर अग्निशामक दलाच्या जवानांनी तात्काळ बंबाकडे धाव घेतली. तर आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी ॲम्ब्युलन्स गाठली. पोलिस प्रशासनाचेही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची माहिती घेवून धाव घेतली. काही मिनिटातच लोकोशेड यार्डमध्ये हे सारे दाखल झाले आणि जलदगतीने मदत कार्य सुरु झाले.

नांदेड विभागास तेथून पुढे उच्चपदस्त अधिकाऱ्यांना या घटनेबद्दल कल्पना देण्यात आली. लगेच मदत कक्षाची स्थापना करण्यात आली व हेल्पलाईन नंबरसुध्दा उपलब्ध करण्यात आला. दुसरीकडे बचाव कार्य



सुरु असतांना बघ्यांची मोठी गर्दी उसळली. बचाव कार्य करणाऱ्या पथकाने आग विझविली. तर एनडीआरएफच्या पथकाने डब्यांची पत्रे कापून डब्यातील प्रवाशांना खिडकीबाहेर काढण्याची कवायत सुरु केली. घसरलेल्या आणि चढलेल्या डब्यातील प्रवाशांना बाहेर काढण्यात आल्यानंतर आरोग्य विभागाच्या पथकांनी तात्काळ मदतकार्य सुरु केले. संयुक्तपणे सुरु केलेल्या या बचाव कार्याच्या पथकांना हा प्रकार मॉकड्रीलचा आहे हे उशीरा कळाले तर बघ्यांनाही त्याहीपेक्षा उशीरा या प्रकाराचे गांभीर्य लक्षात आले.

दरम्यान, दक्षिण मध्य रेल्वे विभागाचे चीफ सेफ्टी अधिकारी श्री व्यंकटरमण रेड्डी, नांदेडच्या व्यवस्थापिका श्रीमती निती सरकार, अप्पर व्यवस्थापक राजेंद्रकुमार मीना, निरीक्षक प्रमोद राय, राहुल रघुवंशी, मुख्य चिकित्सा अधिकारी डॉ. नाईक, सुरक्षा विभागातील प्रमुख हरिकृष्णन, डॉ. विजय कृष्णा, वरिष्ठ वाणिज्य अधिकारी जितेंद्र कुमार, वरिष्ठ विभागीय यांत्रिकी अधिकारी हेमा नाईक यांच्यासह अन्य घटनास्थळी तळ ठोकून होते. श्रीमती निती सरकार यांनी माध्यमांशी बोलतांना ही मॉकड्रील यशस्वी झाल्याचा दावा केला.

## अग्रलेख...

# अतृप्त आत्म्यास सल्ला...

मराठा स्ट्राँगमॅन, जाणता राजा, लोकनेते, शाहू-फुले-आंबेडकरांचे वारसदार इत्यादी... राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना ही विशेषणे गेली पन्नासेक वर्षे लावली जात आहेत. या विशेषणांच्या यादीत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणखी एकाची भर घातली आहे. ते विशेषण आहे 'अतृप्त किंवा भटकी आत्मा.' शरद पवार यांचा इतिहास आणि वर्तमान आणि त्यांच्या पक्षाची सद्यस्थिती पाहिली तर हे विशेषण पवारांना अगदी चपखल लागू पडावे. शरद पवारांची राजकीय कारकीर्द पाच दशकांहून अधिक काळाची. शाळकरी वयापासून त्यांना पुढारी होण्याची हौस होती. घरातले वातावरण तसे शेकापच्या जवळ जाणारे. पण, शरद पवारांनी राजकारण सुरू केले ते काँग्रेसच्या माध्यमातून. युवक काँग्रेसमध्ये त्यांनी संघटनेत मोठी पदे मिळविली आणि काँग्रेसच्या बड्या नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. १९६७ ते १९९० सालापर्यंत ते बारामतीचे आमदार म्हणून सतत निवडून येत राहिले. त्यानंतर ते केंद्र सरकारात गेले. केंद्रीय संरक्षण मंत्री, कृषी मंत्री झाले. त्यापूर्वी आणि त्यानंतर ते चार वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. हे सारे त्यांना काँग्रेसने दिले. पण, शरद पवार सुरुवातीपासून अतृप्त होते. यशवंतराव चव्हाणांचा राजकीय वारसदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले, पण ते त्यांच्याशीही एकनिष्ठ नव्हते. यशवंतराव चव्हाण यांच्यासोबतच वसंतदादा पाटील यांनाही शरद पवारांचे मार्गदर्शक समजले जायचे. पण, याच शरद पवारांनी वसंतदादांचे सरकार पाडले. महाराष्ट्राच्या राजकारणात पाठीत खुपसलेल्या खंजिराची कथा ज्यातून जन्माला आली, ती ही घटना. खंजिराचे कवित्व अद्याप संपलेले नाही. एकीकडे शरद पवार राजीव गांधी यांच्याशी निष्ठा दाखवत होते आणि त्याच वेळी चंद्रशेखर यांना पंतप्रधानपदी निवडण्यासाठी धडपडत होते, हेही दिल्लीवाल्यांनी त्या काळात अनुभवले, पाहिलेले आहे. शालिनीताई पाटलांनी शरद पवारांची तुलना सूर्याजी पिसाळ यांच्याशी केली होती, हेही लोक अद्याप विसरलेले नाहीत. शरद पवार बोलतात एक आणि करतात भलतेच, अशी त्यांची प्रतिमा यातूनच तयार झालेली आहे. राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीपासून ते गतवर्षी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याच्या नाटकापर्यंतचे सगळे अंक ही ढोंगबाजी होती आणि त्यामुळे महाराष्ट्रात व देशात शरद पवार हे नाव अविश्वासाचे समानार्थी ठरत आले आहे. त्यांच्या वेळोवेळच्या कलाकारीला त्यांच्या चाहत्यांनी राजकीय चतुराईची विशेषणे लावली. पण, त्यांच्या कलाकारीतून कधीही त्यांच्या खेरीज कुणाचेच भले झाले नाही. सतत अस्थिरता निर्माण होत राहिली. मुख्यमंत्री बदलत राहिले. सरकारे अस्थिर होत राहिली. ही पूर्णपणे अतृप्त व भटक्या आत्म्याचीच लक्षणे आहेत. आजवर तसे कुणी बोलत नव्हते. पण मोदींनी लोकभावनांना शब्द दिले एवढेच. शरद पवारांनी मूळ काँग्रेसशी घरोबा आणि घटस्फोट करण्याचा प्रयोग वारंवार केला. १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाला आव्हान देऊन त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थापना केली. त्यानंतर निवडणुका झाल्या आणि ज्या सोनिया काँग्रेसला काडीमोड देऊन पवारांनी स्वतंत्र राष्ट्रवादी पक्ष स्थापिला होता, त्याच पक्षाने काँग्रेसशी घरोबा करून महाराष्ट्रात सरकार स्थापन केले. त्यानंतर २००४ मध्ये त्याच सोनिया काँग्रेसप्रणीत संपुआच्या केंद्रीय सरकारात शरद पवार मंत्री बनले. कधी भाजपाला पाठिंबा, कधी शिवसेनेला समर्थन तर कधी नुसताच शाहू-फुले-आंबेडकरवादाचा धोशा. शरद पवार स्वतःला पुरोगामी म्हणवतात. त्यासाठीच त्यांनी भाजपाला सतत राजकीयदृष्ट्या अस्पृश्य ठरविले. शिवसेनेसोबतही ते तसेच वागले. पण, आता अशी स्थिती आहे की, त्यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील सर्व प्रमुख लोक आणि संघटना भाजपासोबत आहेत. त्यांचे बंडखोर पुतणे अजित पवार महाराष्ट्रातील भाजपाप्रणीत महायुती सरकारात उपमुख्यमंत्री आहेत. ज्या शिवसेनेला त्यांनी परवापर्यंत नावे ठेवली, त्यांच्या मांडीला मांडी लावून राजकीय मांडवली करण्याचा प्रसंग शरद पवारांवर आलेला आहे, यालाही त्यांचे समर्थक पवारांची राजकीय लवचीकता वगैरे म्हणू शकतात. खरे तर ही नाचक्की आहे किंवा संधिसाधूपणा आहे. राजकारणातील संधिसाधूपणामुळेच शरद पवारांना त्यांची प्रासंगिकता आणि प्रभाव टिकवून ठेवता आला; मग कोणताही पक्ष सत्तेत असो. युती-आघाडीच्या राजकारणात ते माहीर आहेत, असे म्हणतात. पण, त्याची दुसरी बाजू अशी की, त्यांनी जशी युती-आघाडीची जोडजंतर सरकारे निर्माण केली, तशी अनेकांची सरकारे अस्थिर केली आणि पाडलीही. वसंतदादा पाटील, सुधाकरराव नाईक, विलासराव देशमुख यांच्यापासून ते अगदी आतापर्यंतच्या सर्व मुख्यमंत्र्यांच्या खुर्च्यांना येनकेनप्रकारेण हादरे देण्यात शरद पवारांनी मिळविलेला आसुरी आनंद त्यांच्या

अतृप्त आत्म्याच्या स्वभावाला साजेशा आहे. शरद पवार कोणत्या पक्षाचे आहेत, या प्रश्नाचे एकमेव उत्तर देता येत नाही. शरद पवार कोणत्या विचारांचे, याही प्रश्नाचे एकमेव उत्तर देता येत नाही. शरद पवार नेमके कुणाचे, याही प्रश्नावर बराच गूळ पाडला जाऊ शकतो. ते कुणाचेच नाहीत. असलेच तर ते स्वतःचे आणि सत्तेचे आहेत. त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये युतीला कौल मिळालेला असताना मध्येच घुसखोरी करून महाविकास आघाडीचे सरकार आणले. पहाटेच्या शपथविधीचा उभयान्वयी प्रयोग हा तर त्यांचा 'मास्टर स्ट्रोक' होता म्हणतात. एकीकडे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत बसले तर दुसरीकडे शरद पवारांचे भाजपाच्या नेत्यांशी संधान बांधणे सुरू होते. शरद पवारांना विश्वासार्ह नेता वगळता बाकी काहीही म्हणता येते, या एका जुन्या जाणत्या नेत्याच्या वाक्याचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे. काँग्रेसचे एक जुने प्रदेशाध्यक्ष होते. त्यांनी एका पत्रकार परिषदेनंतर खाजगीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रयोगाविषयी असे म्हटले होते की, स्वतःच्या शेतात उभे राहून भोवताली असलेल्या इतरांच्या शेतात पाईपलाईन टाकून ठेवण्याची पवारांची सवय जुनीच आहे. शरदरावांची राष्ट्रवादी काँग्रेस ही अशीच आणखी एक पाईपलाईन आहे. आता त्या वाक्याचा अर्थ शरद पवारांच्या कमालीच्या स्वार्थी राजकीय भूमिकांवरून प्रकर्षाने लक्षात येतो. राजकारणात डावपेच खेळावेच लागतात. पण, डावपेचातून राज्याचे-लोकांचे नुकसान होणार नाही, अस्थिरता निर्माण होणार नाही, याची काळजी समंजस राजकीय पुढारी घेत असतात. त्यांनी परिपक्वतेने वागणे अपेक्षितच आहे. पवारांनी गत काळात सातत्याने सरकारे अस्थिर करण्याखेरीज दुसरे काहीही केलेले नाही. शरद पवार लोककल्याणापेक्षा वैयक्तिक आणि राजकीय लाभाला प्राधान्य देतात. स्वतःच संकटसदृश स्थिती निर्माण करायची आणि मग पुढे येऊन काही तरी मार्ग काढल्यासारखे दाखवायचे, ही त्यांची जुनी खोड आहे. त्यातून त्यांची स्वतःची विश्वासार्हता रसातळाला गेली; शिवाय राजकीय खेळांबद्दल लोकांच्या मनात चीड निर्माण झालेली आहे. निष्ठा, विश्वास, बांधिलकी अशा शब्दांनी पवारांच्या शब्दकोशातून स्वतःच काढता पाय घ्यावा, इतके टोकाचे विसंगत वर्तन पवारांनी वारंवार दाखविले आहे. आता त्यांच्या पक्षाचे सरकार महाराष्ट्रात किंवा देशात नाही. इतक्यात ते येण्याचीही शक्यता नाही. त्यांना आता आणखी सवड मिळेल. या रिकामपणाच्या काळात काडेलपणा करण्याऐवजी स्वतःच्या शब्दकोशातून बाहेर पडलेल्या शब्दांच्या रिकाम्या जागांवर त्यांनी जरा चिंतन केले तर त्यांचाच फायदा आहे. अतृप्त आत्म्यासाठी हा फुकटचा सल्ला आहे.

---

## प्रासंगिक

# 'कळे न हा चेहरा कुणाचा?'

**राहुल गोखले**

'इंडिया आघाडी सत्तेत आली तर पाच वर्षांत पाच पंतप्रधान होतील आणि देश असा चालू शकत नाही,' असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. याचे कारण स्पष्ट आहे आणि ते म्हणजे मोदींच्या विरोधात इंडिया आघाडीचा चेहरा कोण? याचा अद्याप न झालेला उलगडा. वास्तविक, या आघाडीच्या बैठका गेल्या वर्षीपासून सुरू होत्या आणि भाजपा विरोधकांची आघाडी निश्चित होईल, अशा आणाभाका घेतल्या जात होत्या. मात्र, भूतकाळात अशा आघाड्यांचे जे प्राक्तन तेच यावेळीही कायम राहिले. ते म्हणजे प्रारंभीचा उत्साह आणि नंतरचे मतभेद. नितीश कुमार, ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीला सोडचिठ्ठी दिली. पैकी नितीश यांनी भाजपाशी हातमिळवणी केली. त्यामुळे ते इंडिया आघाडीचा नेतृत्वपदाचा चेहरा असतील, याची शक्यता संपुष्टात आली. ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे नाव इंडिया आघाडीचा पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून सुचविले आणि नंतर लगेचच त्या आघाडीतून बाहेर पडल्या; कारण पश्चिम बंगालमध्ये त्यांच्या तृणमूल काँग्रेसची लढत भाजपाप्रमाणे काँग्रेस-डाव्यांशीदेखील आहे. शिवाय खडगे यांनीदेखील अगोदर निवडणूक; नंतर नेतेपदाची चर्चा अशी भूमिका घेतल्याने तो मुद्दा तेथेच बासनात बांधण्यात आला. द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (ठाकरे गट), समाजवादी पक्ष यांच्याशी त्या त्या राज्यांत काँग्रेसने जागावाटपाचा समझोता केला आहे, हे खरे; पण त्या पक्षांच्या नेत्यांना राष्ट्रीय राजकारणात ना स्वारस्य ना त्यांचा तसा अनुभव; ना त्यांच्या पक्षाची तशी व्याप्ती ना त्यांना तसे जनसमर्थन. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव हे लोकसभेची निवडणूक लढवत असले, तरी ते काही पंतप्रधानपदाचे उमेदवार असू शकत नाहीत. या सगळ्या पृष्ठभूमीवर मोदी यांनी इंडिया आघाडीत सर्वोच्च पदावरून असलेला संभ्रम अधोरेखित केला आहे. त्यावर आघाडीकडे पंतप्रधानपदाचे अनेक चेहरे आहेत, असे थातूरमातूर उत्तर देऊन वेळ मारून नेता येत असली, तरी त्याने वास्तविकता बदलत नाही.

२००४ साली केंद्रातील भाजपा सरकारला पायउतार व्हावे लागल्यानंतर सत्तेत आलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचे नेतृत्व सोनिया गांधी करणार हे गृहीतच धरले जात असताना त्यांनी नकार दिला आणि ती धुरा डॉ. मनमोहन सिंग यांना सोपविण्यात आली. डॉ. सिंग यांच्या नेतृत्वाखाली २००९ ची लोकसभा निवडणूक संयुक्त पुरोगामी आघाडीने जिंकली; त्यामुळे निवडणुकीपूर्वी पंतप्रधानपदाचा चेहरा ठरविणे तितकेसे महत्त्वाचे नाही, असा युक्तिवाद कदाचित करण्यात येईल. काही अंशी त्यात तथ्य; त्याबरोबरच हेही खरे की, २००४ किंवा २००९ आणि २०२४ मधील राजकीय नेपथ्यात मोठी तफावत आहे. १९९८ पासून केंद्रात भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेत असले, तरी ते एकपक्षीय सरकार नव्हते. सुमारे २०-२५ पक्षांचा सहभाग असणारे ते आघाडी सरकार होते. त्याचे नेतृत्व अटलबिहारी वाजपेयी करीत असले, तरी ते काही भाजपा सरकार नव्हते. १९९९ सालच्या निवडणुका राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जिंकल्या त्या वाजपेयी यांच्या चेहऱ्यामुळेच. १९९९ सालीच लोकसभेत विश्वासदर्शक ठरावात त्यांच्या सरकारचा अवघ्या एका मताच्या अंतराने पराभव झाला होता. तेव्हा वाजपेयी यांना ती सहानुभूती मिळाली होती. मात्र, तो सर्व काळ हा आघाडी सरकारांचा होता. एकपक्षीय सरकार सत्तेत येणार नाही अशीच जेव्हा स्थिती असते तेव्हा निवडणुकीनंतर सरकारच्या प्रमुखपदाचा चेहरा ठरविला जाण्यात मतदारांना फारसे आक्षेपार्ह वाटत नाही. तथापि, आता ती स्थिती बदललेली आहे.वाजपेयी यांच्यासारखा लोकप्रिय व सर्वमान्य नेता सरकारचे नेतृत्व करीत असला, तरी आपल्या पक्षाची धोरणे पूर्णार्थाने राबविण्यात त्यांना मर्यादा होत्या. नंतर सत्तेत आलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये काँग्रेसला डाव्यांसह अन्य पक्षांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या होत्या, हे सर्वश्रुत आहे. यातून धोरणांच्या अंमलबजावणीचा होणारा खेळखंडोबा देशाच्या वाटचालीला खीळ घालणारा असतो, असाही अनुभव मतदारांनी घेतला आहे. त्यामुळे शक्यतो एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत देण्याकडे मतदारांचा आता कल असतो. आणि म्हणूनच त्या पक्षाची धोरणे प्रभावीपणे राबविण्यासाठी नेत्याचा आश्वासक चेहरा आवश्यक ठरू लागला आहे. हे केवळ लोकसभेच्या निवडणुकांनाच लागू आहे, असे नाही तर विधानसभांच्या निवडणुकांनादेखील लागू आहे. २०१४ नंतर केंद्रातच नव्हे तर अनेक राज्यांत असेच एकाच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळण्याचा काळ सुरू झाला. साहजिकच नेतृत्वाचा चेहरा कोण हा मुद्दा कळीचा बनला. तथापि, विरोधकांची शोकांतिका ही की, गेल्या १० वर्षांत भाजपा विरोधकांना मोदींना आव्हान देऊ शकेल असा एकही चेहरा शोधता आलेला नाही. इंडिया आघाडीचे सरकार सत्तेत आले तर त्यांचा नेता कोण हा प्रश्न निवडणुकीनंतर सोडविता येईल इतका सोपा नाही; तसा तो असता तर अगोदरच इंडिया आघाडीने नेतृत्वाचा चेहरा ठरवून टाकला असता. आघाडीतील सर्वच पक्ष कमी-अधिक प्रमाणावर तितक्याच जागा जिंकलेले असतील तर त्यातील कोणत्या पक्षाच्या नेत्याला अन्य पक्षांच्या तुल्यबळ नेत्यांनी मान्यता द्यावी यावर तोडगा निघणे दुरापास्त.

अडथळ्यांची ही शर्यत टाळायची तर आघाडीत एक पक्ष मोठा असावा लागतो आणि तोही इतका मोठा की, आघाडीत दुसऱ्या स्थानावर असणाऱ्या पक्षाला अव्वल पक्षाशी सहजासहजी स्पर्धा करता येऊ नये. इंडिया आघाडीतील स्थिती तशी दिसत नाही. मुळात एकपक्षीय सरकारने येणारी राजकीय स्थिरता सोडून आघाडी सरकारला सत्तेत आणून अस्थिरतेला निमंत्रण द्यायचे का, याचा विचार मतदार केल्यावाचून राहणार नाहीत. त्यातही आघाडीचा सर्वमान्य नेता कोण हे गुलदस्त्यात. काँग्रेसला ते नेतृत्व मिळेल असे म्हणावे तर २०१४ आणि २०१९ मधील लोकसभा निवडणुकांत काँग्रेसच्या दारुण पराभवाचे स्मरण झाल्याखेरीज राहत नाही. शिवाय सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खडगे हे लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात नाहीत. राहुल गांधी यांनी वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढविली असली, तरी पक्षाचे ते अध्यक्ष नाहीत. ती जबाबदारी टाळणाऱ्या राहुल यांनी पंतप्रधानपदाला गवसणी घालण्याचे स्वप्न पाहावे हे हास्यास्पद. गांधी कुटुंबीयातील कोणी चेहरा नसेल तर पक्षाला अन्य नेत्याचा शोध घ्यावा लागेल. कोणता नेता आघाडीतील अन्य पक्षांना मान्य होईल, या अगोदर प्रश्न, कोणता काँग्रेस नेता पक्षांतर्गत सर्वमान्य ठरेल, हाही आहे आणि तो क्लिष्ट आहे.

'निवडणूक म्हणजे सौंदर्य स्पर्धा नव्हे!' अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी दिली आहे. 'इंदिरा इज इंडिया' असा नारा देणाऱ्या आणि इंदिरा गांधींच्या हत्येनंतर पंतप्रधानपदाची धुरा रातोरात राजीव गांधी यांच्याकडे सोपविणाऱ्या पक्षाच्या नेत्याने असे शेलके विधान करावे, हा निव्वळ दुटप्पीपणा. शिवाय रमेश म्हणतात हे खरे असेल तर राहुल हेच पंतप्रधानपदाचा चेहरा आहेत, असे पटोले यांनी जाहीर करण्याचा अर्थ काय? एकूण सावळा गोंधळ आहे. नेता ठरविता येत नाही ही अडचण मान्य न करता त्या मुद्याला बगल देण्यात तात्पुरता दिलासा शोधण्यात हे पक्ष धन्यता मानत आहेत, इतकाच या सर्व सव्यापसव्याचा अर्थ. सुरेश भटांनी वेगळ्या संदर्भात लिहिलेल्या पंक्ती 'नेता कोण?' या निर्णयाच्या बाबतीत आघाडीच्या चालढकलीला आणि संभ्रमाला चपखल लागू पडतात... 'कळे न हा चेहरा कुणाचा?'

९८२२८२८८१९

---

## वेध

**विजय निचकवडे**

# झाले 'इलेक्शन', जपा 'रिलेशन'!

निवडणुकीपर्यंत हातात हात घेऊन जाणारे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहजतेने सहभागी होणारे निवडणुकीनंतर मात्र काहीसे दुरावल्यागत दिसत आहेत. निवडणुकीच्या काळात प्रचाराच्या निमित्ताने एकमेकांचे वाभाडे काढणारे नेते नंतर मात्र गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. याच नेत्यांसाठी जिवाचे रान करणारे कार्यकर्ते मात्र आपापसांत वैर घेऊन बसतात. निवडणुकीमुळे भाऊबंदकी आणि मैत्रीत येणारे वितुष्ट कुणासाठी, याचा विचार करून संबंध जपण्याची वेळ आली आहे. 'नेत्यांचे झाले भले, कार्यकर्ते आपसात लढे' हे होण्यापेक्षा 'झाले इलेक्शन, जपा रिलेशन' या सूत्राचा अवलंब झाल्यास जिवाला जीव देणारा माणूस कधीच दुरावणार नाही.

राजकारणाची नशा भल्याभल्यांना वेड लावणारी आहे. ज्यांच्यासाठी राजकारण केले जाते, ते या नशेतही स्वतःला सजग ठेवतात. म्हणूनच तर केवळ राजकीय विरोधापुरता त्यांचा विरोध असतो. एरवी एकमेकांचे कट्टर विरोधकही एकाच पंगतीत बसून हसत-खेळत जेवताना दिसतात. यावेळी कुठेही त्यांच्या चेहऱ्यावर द्वेष किंवा राग दिसत नाही. मात्र, नेत्यांचे हे गुण नेत्यासाठी झगडणारा सामान्य कार्यकर्ता अजूनही अवगत करू शकला नाही. म्हणूनच निवडणूक झाली की कधीकाळी एकमेकांचे जिवलग असलेलेही कट्टर वैरी झाल्याचे अनुभवास येते. हे वैर कुणासाठी याचा जराही विचार त्या सामान्य आणि निरागस कार्यकर्त्याच्या मनाला शिवत नाही. आपल्या नेत्यासाठी तो कुठल्याही स्तराला जायला तयार असतो. व्यासपीठावरून नेत्याने एखाद्याची उणीदुणी काढली की कार्यकर्ता त्याचीच 'री' ओढीत चालत राहतो. हा आवेश इतका असतो की, एकमेकांच्या अंगावरही कार्यकर्ते चालून जाण्यास मागेपुढे पाहात नाहीत. त्यातून साध्य काय होणार, याची जराही गोळाबेरीज त्यांच्या जवळ नसते. निवडणूक काळात नेते एकमेकांची लायकी काढून मोकळे होतात; मात्र नंतर कायम संबंध जपण्याची कला त्यांना अवगत असते. म्हणूनच कट्टर विरोधकही निवडणुकीनंतर एकमेकांशी गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात.



नेत्यांची हे गुण आमचा कार्यकर्ता अजूनही घेऊ शकला नाही. निवडणुकीने घराघरांत वितुष्ट आल्याची अनेक उदाहरणे आहेत. एकाच घरातील दोन वेगवेगळ्या पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे कार्यकर्ते एकमेकांच्या घराचा उंबरठा ओलांडतानाही विचार करतात. कधीकाळी जिवलग असलेले मित्र निवडणुकीनंतर एकमेकांच्या तोंडावर तोंड पडणार नाही, याची काळजी घेतात. सुख-दुःखात सहभागी होतानाही या दोघांमध्ये आड येते, ते निवडणूक काळातील नेत्यासाठी एकमेकांच्या विरोधात पुकारलेले बंड. निवडणूक नेत्यांची होते, पण दोस्तीत दुरावे आणि गल्लीत दुफळ्या निर्माण होतात. याचा कधी कोणी विचार केला आहे का?

जय-पराजय लागलेच आहे, पण यासाठी आपण आपल्या वर्षानुवर्षांच्या नात्यांना पराभूत करायचे काय? याचा विचार व्हायलाच पाहिजे. कुणाचा नातेवाईक कुण्या एका पक्षातून निवडणूक लढवीत असताना, तो ज्या पक्षात आहे, त्या पक्षावरील त्याच्या निष्ठेबद्दल शंका घेणे कितपत योग्य आहे? निवडणूक ही विचारांची भिन्नता म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. व्यक्तिगत विरोध या नजरेतून निवडणुकीकडे पाहिले गेल्यास मैत्री आणि रक्ताच्या नात्यांवर निवडणुकीनंतर संकट आल्याशिवाय राहणार नाही. नेत्यांच्या निवडणुका सध्या संपल्या आहेत. वरिष्ठ पातळीवर त्यांच्या भेटीसाठी आणि गुण्यागोविंदाने नांदणे सुरू झाले आहे. पण निवडणुकीची ती धग अजूनही ग्रामीण भागात कार्यकर्त्यांमध्ये जाणवते. निवडणूक काळात जे काही झाले, त्याचा राग अजूनही अनेकांच्या मनात घर करून बसला आहे. घरे दुरावली आहेत तर चांगल्या मित्रांची मैत्री बाधित झाली आहे. त्यामुळे आता गुलाल कुणाचाही असो, माणसं आपली आहेत, या भावनेतून विचार होणे गरजेचे आहे. 'इलेक्शन' संपले; आता खरी कसोटी 'रिलेशन' जपण्याची आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने निवडणूक काळात घातलेला पक्षाचा चष्मा बाहेर काढून आधी सारखेच वागणे सुरू केल्यास दुखावलेली मने आणि दुरावलेले मित्र नक्कीच जवळ येतील, यात शंका नाही. ज्या नेत्यांसाठी आपण लढतो, त्या नेत्यांकडून किमान हा गुण तरी कार्यकर्त्यांनी घ्यायला पाहिजे. समाज माध्यमांवर अनेक संदेश फिरत असतात. मात्र, हा संदेश नक्कीच समाजमन जपणारा असाच म्हणता येईल.

९७६३७१३४१७

---

## धर्म-संस्कृती

# कन्यादान म्हणजे गोत्रप्रदान!

**प्रा. दिलीप जोशी**

हा विषय घेण्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील नामवंत पत्रकार असलेले माझे एक मित्र मला भेटायला आले. गप्पागप्पात कन्यादानावर विषय आला. ते म्हणाले, ''कन्या जर दानात द्यायची वस्तू असेल तर मी कन्यादान न करता नोंदणीकृत विवाह करेल.'' त्यांच्याशी कन्यादानावर मी शास्त्रीय चर्चा केल्यावर त्यांचे मतपरिवर्तन झाले. भारतीय कुटुंब पद्धती जगात सर्वश्रेष्ठ असून जीवनात सुख आणि शांतीचा मार्गसोपान म्हणजे भारतीय कुटुंब व्यवस्था आहे. म्हणूनच 'धन्यो गृहस्थाश्रमः' म्हटले जाते. अशांत जगात शांतीचा मार्ग म्हणून आपल्या भारतीय कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास होत आहे.

एकीकडे वर्षभर लग्न टिकले म्हणून लग्नाचा वाढदिवस (वेडिंग ॲनिव्हर्सरी) साजरे करणारी पाश्चात्त्य संस्कृती कुठे अन् साता जन्माच्या गाठी मानणारी आपली भारतीय संस्कृती कुठे? विवाह हे कंत्राट मानणारी विदेशी भावना आणि विवाह हा संस्कार मानणारी हिंदू संस्कृती यांच्यात तुलना होणे अशक्यच. स्त्रीला उपभोग्य वस्तू मानणारे तिकडे तर 'धर्मेच, अर्थेच, कामेच नातिचरामि' असा संकल्प, प्रतिज्ञा आणि शपथ घेणारी आणि स्त्रीला उच्च दर्जा देणारी आपली पवित्र संस्कृती इकडे आहे. आपल्याकडे विवाह हा संस्कार असून लग्नबंधन म्हणजे 'हृदया हृदय एक जाहले' हा भाव आहे. लग्न म्हणजे दोन जिवांचे मिलन, दोन कुटुंबाचे मिलन, दोन गोत्रांचा संगम. विवाह प्रक्रियेत मुलगा मुलगी एकमेकांना पाहतात, दोघांचीही पसंती विचारली जाते, दोघांनीही एकमेकांना पसंती दिली तर घराणी अभ्यासली जातात. वाङ्निश्चय, सिमांतपूजन इत्यादी प्रक्रियेतून नियोजनबद्ध असा विवाह सोहळा साकारला जातो.

लग्नसंस्कारात अत्यंत भावपूर्ण, तितकाच महत्त्वाचा आणि अग्नीच्या साक्षीने केला जाणारा विधी म्हणजे 'कन्यादान' विधी होय.

'कन्यादान' या शब्दावर बरीच उलटसुलट चर्चा नेहमीच होत असते. कन्या काय वस्तू आहे का म्हणून तिचे दान होते? वगैरे वगैरे बाबींवर वादसंवाद होतात. खरं म्हणजे या विधीला 'कन्यादान' हा शब्द वापरणे शास्त्रसंमत नाही; पण तो रूढ झालेला प्रचलित शब्द आहे. 'कन्यादान' हा शब्द रूढ का झाला असावा? तर, कन्या म्हणजे बापाच्या काळजाचा तुकडा, मायबापाची अंगक, जीवीची जिवलग. तळहातावरच्या फोडाप्रमाणे, आत्यंतिक प्रेमाने लालनपालन, शिक्षण, संस्कार करत जिवापाड जपायचं आणि ही मुलगी वयात आली की, हा काळजाचा तुकडा परक्या घरी पाठवायचा. यातील मनोसंवेदना फक्त मायबापच अनुभवतात. मायबाप सोडून ती अनुभूती इतरांना शक्य नाही.



महाकवी कालिदासांनी 'अभिज्ञान शाकुंतला'त जेव्हा शकुंतला सासरी जाते तेव्हाची काण्व महामुनींची भावावस्था वर्णन केली.

*यास्यत्यद्य शकुन्तलेति हृदयं संसपृष्टमुत्कण्ठया,*
*कण्ठः स्तम्भितवाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडंदर्शनम् ।*
*वैक्लव्यं मम तावदीदृशमिदं स्नेहादरण्योकसः,*
*पीड्यन्ते गृहिणः कथं न तनयाविश्लेषदु:खैनवैः ॥*

शकुंतला ही काण्व महामुनींची मानस कन्या. काण्वमुनी संन्यस्त आणि आश्रमवासी. असे असूनही शकुंतलेच्या सासरी जाण्याने योगी असलेले काण्व ऋषी सख्ख्या नाही तर मानलेल्या कन्येसाठी विव्हळ झाले. ते संन्यासी असून भावविभोर होतात तर सामान्य संसारी मायबापांच्या अवस्थेची कल्पना न केलेलीच बरी.

या भावविव्हळ अवस्थेत काण्व महामुनींच्या तोंडी शब्द येतात-
*अर्थो हि कन्या परकीय एव । तामद्य सम्प्रेष्य परिग्रहीतुः ।*
*जातो ममायं विशदः प्रकामं । प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ॥*

मुलगी काळजाचा तुकडा असला तरी तिचे लग्न झाल्यावर तिच्या बापाला हलके वाटते. आपल्याकडे जबाबदारीतून मुक्त झालो म्हणण्याचा प्रघात आहे. ही वस्तुस्थिती आहे.

'दिल्या घरी तु सुखी राहा' हा भाव मनात असतोच. हेच आपण मंगलाष्टक म्हणताना 'कन्या हे परकीय वित्त म्हणूनी, निर्व्याज सांभाळीले' म्हणतो. याचा अर्थ कन्या ही दानवस्तू होत नाही तर ते परकोटीचे प्रेम आहे. व्यवहारातही आपण नेहमीच म्हणतो, 'पैसा नाही कमावला मी! पण मुले पायावर उभी केलीत. माझी मुलेच माझी संपत्ती!' इथे मुले म्हणजे धन, संपत्ती नसून तो स्वाभिमान आहे.

बरं! कन्या आहे म्हणून तिला अधिकार नाही, असे आपल्या भारतात मुळीच नव्हते. उलट भारतीय संस्कृतीत अनेक स्वयंवर कथा आपल्याला माहीत आहेत. स्वयंवरामध्ये वर निवडीचा अधिकारच उपवर कन्येला दिलेला आहे. यात कन्या आलेल्या वरापैकी आपल्या पसंतीच्या एकाच्या गळ्यात वरमाला घालायची. याचा अर्थ बाकीच्यांना ती नकार द्यायची. तिचा नकाराधिकार अबाधित असायचा. यावरून हेच सिद्ध होते की, कन्या पूर्णाधिकारी असायची. त्यामुळे ती दानाची वस्तू कधीच नव्हती. उलट वर पसंतीत पूर्वापार तिचे पूर्ण मत घेतले जात होते. आताही मुलीची पसंती नसेल तर विवाह पुढे सरकत नाही. म्हणून 'कन्यादान' हा शब्दशः अर्थ घेणे योग्य नसून त्यातील गर्भितार्थ आणि रुढार्थ समजून घेतला पाहिजे. 'कन्यादान' हा शब्द रुढार्थ असेल तर मूळ शब्द कोणता? हा प्रश्न साहजिक आहे. हिंदू धर्मात कन्यादान हा विवाहातील विधी आहे. कन्यादान हा रूढार्थाने वापरला गेलेला आणि वारंवारितेमुळे प्रचलित झालेला शब्द असून शास्त्रात त्याला 'गोत्रदान' म्हणतात. कन्यादान ही दानाच्या पेक्षाही अधिक उच्च कृती म्हणून या विधीला गोत्रप्रदान विधी म्हटले आहे. दानात अपेक्षा असतात, पण प्रदान निरपेक्ष असते. म्हणून गोत्रप्रदान अत्युत्तम. ते आपण समजून घेऊ.

मुलगी ज्या कुळात जन्माला आली ते तिचे जन्म कुळ. त्या कुळाचे जे गोत्र तेच मुलीचेही जन्मगोत्र. जन्म होताच वडिलांचे गोत्र तिला प्राप्त होते; अर्थातच हेच तिचे जन्मजात गोत्र. वयात येईपर्यंत ती याचं गोत्रात लहानाची मोठी होते. आपल्या वडील कुलात वाढता वाढता वयात आल्यावर तिचा विवाह करणे क्रमप्राप्त होते. मुळातच हिंदू संस्कृतीत स्त्री ही माता, शक्ती स्वरूपा आणि पूजनीय मानली आहे. आपली संस्कृती शिवशक्ती ऐक्यावर आधारित आहे. शक्तीशिवाय शिव नाही आणि शिवाशिवाय शक्ती नाही. त्यामुळे कन्येला वस्तू संबोधणे शक्यच नाही. ती कुटुंबाचा मूलाधार आहे. थोडक्यात वारंवारितेमुळे रूढ झालेला शब्द कन्यादान असला, तरी ते गोत्रदान आहे.

९८२२२६२७३५

---

## लाटबीट काहीही नाही

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांत फूट पडली आणि दोघांच्याही बाबतीत पक्षाचे नाव व पक्षचिन्हही गेले त्याबद्दल त्यांच्या बाबतीत राज्यात सहानुभूतीची लाट असल्याची 'टेबलकुक्ड' बातमी काही दिवसांपूर्वी काही पत्रकारांनी दिली. २८ एप्रिल रोजी छगन भुजबळ यांनी तशाच आशयाचे मात्र संदिग्ध विधान केल्याची बातमी पसरविण्यात आली. प्रत्यक्षात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याबद्दल सहानुभूतीची लाटबीट काहीही नसून तिरस्काराचीच लाट आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी तत्कालीन शिवसेना आणि भाजपा यांची निवडणूकपूर्व युती होती. त्यावेळी हिंदुत्वप्रेमी मतदारांनी युतीला स्पष्ट बहुमत दिले होते. मात्र, उद्धव ठाकरे यांनी युतीचा धर्म न पाळता, मुख्यमंत्रिपदाचे आमिष दाखवताच पलटी मारली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत सरकार स्थापन करून हिंदुत्वप्रेमी मतदारांचा विश्वासघात केला. साखरपुडा एकाशी करून लग्न दुसऱ्याशी करण्याचा व्यभिचार केला. त्यांनी आदित्य ठाकरेंना



सोबत घेऊन १०, जनपथ येथे जाऊन सोनिया गांधींपुढे मुजरा केला, ते पाहून बाळासाहेबांनी स्वर्गात अश्रू ढाळले असतील. त्यांच्या गुरूंनी दुसऱ्यांचे पक्ष आणि घरे फोडण्याचेच काम केले, त्यांना नियतीने काव्यगत न्याय- पोएटिक जस्टिस दिला. तेव्हा त्या दोघांबद्दल सहानुभूतीची लाटबीट काहीही नसून तिरस्काराचीच लाट आहे आणि त्याचे प्रत्यंतर ४ जून रोजी येणारच आहे.

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

## वाचक पत्रे

### एक मत वाया गेलं...

नुकत्याच एका कार्यक्रमात कलाकार संकर्षण कऱ्हाडे यांनी एका सामान्य नागरिकाच्या मनात खदखदणाऱ्या विचारांची कविता सादर केली. जनसामान्यांच्या मनाला भावणारी अशी ती कविता राजकीय नेत्यांच्या हृदयाला भिडली, हे त्यांना फोनवरून आणि प्रत्यक्ष भेटीतून भेटलेल्या राजकीय मंडळींच्या संभाषणातून समजून गेले. खरोखरीच जे काही सध्या राजकारणात चालू आहे त्याची ही वैचारिक चित्रफीत होती. एकाच कुटुंबातली वेगवेगळ्या पक्षांची मंडळी हा राजकीय तमाशा पाहून गांगरून गेली आहे, याचे हे सुंदर समीकरण कऱ्हाडे यांनी एखाद्या गणितातील प्रमेयाप्रमाणे जनताजनार्दन आणि पुढारी यांच्या पुढे सोडविण्याचा उत्तम प्रयास केला आहे, त्याबद्दल त्यांना खूप खूप धन्यवाद. तरीही या लोकशाही उत्सवात आपल्या मताची किंमत कोणीही वाया घालवू नये, ही कळकळीची विनंती. शेवटी नोटा हा पर्याय उपलब्ध आहेच. 'ज्यांच्या विरोधात मत दिले त्यांच्याच हाती कमळ आले, पण तळमळ होती मतदानाची म्हणून मत दिले, पण मनापासून ते वाया गेले' हे सांगण्याची लकब संकर्षण यांनी दाखवून 'नेत्यांनो कितीही बदललेत पक्ष तरी आमचे आहे तुमच्याकडे लक्ष' हेही ठणकावले. म्हणूनच नेते आणि जनता दोघांनीही सावध राहूनच आपला हक्क सिद्ध करावा; जेणेकरून मत वाया गेले, असे म्हणण्याची वेळ कोणीही आणू न देता हा लोकशाही उत्सव आनंदाने साजरा करावा आणि रंगमंचाच्या कलाकारीकेतून अशीच काव्ये सादर व्हावीत.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

### दुष्काळाचे सावट

दिवसेंदिवस राज्यावरील दुष्काळाचे सावट गडद होत चालले आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शेतीसाठी तर सोडाच; पण पिण्यासाठीही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. विशेषतः मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहेत. मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांत अल्प पाणी साठा शिल्लक आहे. राज्यातील पाण्याची पातळीही कमालीची खालावली आहे. एका एका हंड्यासाठी नागरिकांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. 'टँकरमुक्त महाराष्ट्र' ही संकल्पना अजूनही साध्य झालेली नाही. ते अजूनही स्वप्नच आहे. राज्यात टँकर चालूच आहेत. ग्रामीण भागासह शहरी भागातही टँकरची मागणी वाढली आहे. पिण्याच्या पाण्याची ही अवस्था असेल तर शेतीच्या पाण्याचे काय? पाण्याअभावी खरिपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील निवडणुका संपल्यावर आचारसंहिता शिथिल करून दुष्काळी कामे हाती घ्यायला हवीत. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रालाच दिलासा मिळेल, असे काम प्रशासनाने करायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दारूड्या पतीने घटस्फोटाची मागणी करणाऱ्या पत्नीला भोसकले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ एप्रिल**

पत्नी बाहेर नोकरी करत असल्याने आणि घटस्फोटाची तक्रार दिल्याच्या रागातून दारुड्या पतीने पत्नीच्या पोटात चाकूने भोसकले. प्राणघातक हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून तिची मृत्यूशी झुंज सुरु आहे. हि खळबळजनक घटना अंबाजोगाई शहरातील अंबिका कॉलनीत सोमवारी (दि.३०) रात्री घडली.

भाग्यश्री मयूर शर्मा (वय ३८, रा. अंबाजोगाई) असे त्या जखमी पत्नीचे नाव आहे. बारा वर्षापूर्वी भाग्यश्रीने घरच्यांचा विरोध झुगारून मयूर बाबूलाल शर्मा (सध्या रा. छत्रपती चौक, अंबाजोगाई) याच्यासोबत आंतरजातीय प्रेमविवाह केला होता. मयूरची बहिण कोमल पंचारिया यांच्या फिर्यादीनुसार, मागील सहा वर्षापासून मयूर दारूच्या आहारी गेला आहे. त्यामुळे मयूरची पत्नी भाग्यश्री आणि आई-वडिलांसोबत सतत वाद होत होता. त्यातच भाग्यश्री बाहेर नोकरी करू लागल्याने त्याचा तिच्यावर राग असायचा. मागील वर्षभरापासून ती एका खाजगी रुग्णालयात नोकरी करत होती. मयूरच्या त्रासाला कंटाळून भाग्यश्री काही दिवसापासून 'मानवलोक' संस्थेच्या मनस्विनी प्रकल्पात राहत होती आणि तिथूनच तिने मयूर विरुद्ध घटस्फोटाची तक्रार दिली होती. सोमवारी रात्री ८ च्या सुमारास मयुरने भाग्यश्रीला रुग्णालयाच्या बाहेर बोलावले आणि ते दोघे अंबिका कॉलनीतील हनुमान मंदिराकडे गेले. तिथे मंदिरासमोर मयूरने सोबत आणलेला चाकू बाहेर काढून जीवे मारण्याच्या उद्देशाने भाग्यश्रीच्या पोटात भोसकले आणि निघून गेला. हा वार एवढा भयंकर होता कि भाग्यश्रीच्या पोटातील आतडी बाहेर आली. भाग्यश्री काम करत असलेल्या रुग्णालयातील कर्मचार्यांनी तिला जखमी अवस्थेत तातडीने स्वाराती रुग्णालयात दाखल केले. तिथे भाग्यश्रीवर तत्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली असून अद्यापही तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. याप्रकरणी कोमल पंचारिया यांच्या फिर्यादीवरून मयूर शर्मा याच्यावर अंबाजोगाई शहर ठाण्यात कलम ३०७ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. पुढील तपास एपीआय जाधवर करत आहेत. दरम्यान, हल्ला करून मयूर शर्मा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

केवळ पत्नीवरच प्राणघातक हल्ला करून मयूर थांबला नाही. त्यानंतर त्याने बहिण कोमल यांना कॉल केला आणि 'मी तिचे काम केलंय, आता तुझा नंबर आहे, मी तुला दाखवतो' अशी धमकी दिली. त्यानंतर घाबरलेल्या बहिणीने पतीसोबत अंबाजोगाई गाठून भावा विरोधात तक्रार दिली आहे.

# गोदावरीचे पाणी सिंदफणेत आणण्यासाठी प्रयत्न करणार!

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ एप्रिल**

जिल्ह्याचे सिंचन क्षेत्र वाढवून हा भाग सुजलाम सुफलाम व्हावा आणि शेतकरी राजा सुखी व्हावा. म्हणून गोदावरीचे पाणी सिंदफणेत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे बोलताना दिले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, माजी मंत्री लोकनेते बदामराव आबा पंडित, प्रदेश प्रवक्त्या सुशीला मोराळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, पंढरीनाथ लगड, अण्णासाहेब राठोड, महेश बेदरे, विक्रम दाभाडे , दिनकर पवार हे गेवराई तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन मतदारांची सुसंवाद साधत आहेत.

बजरंग बप्पा सोनवणे यांनी गेवराई तालुक्यातील विविध गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी मादळमोही येथील झालेल्या सभेत पालकमंत्र्यांना उद्देशून म्हणाले की, मागील दहा वर्षां पूर्वी देखील तुमच्याच भगिनी खासदार होत्या. मग त्या भाजप सोबत एकनिष्ठ नव्हत्या की काय? म्हणून तुम्ही पंतप्रधानाच्या नजिक गेल्यास विविध योजना आणण्यासाठी मतदान मागत आहात. असे कोपरखळी मारली. आज भाजपच मतासाठी जातीवाद करीत आहे. परंतु खुल्या प्रवर्गानेच मागील पंधरा वर्षा पासून जिल्ह्याचा खासदार म्हणून ओबीसी प्रवर्गाला संधी दिली. तसेच बजरंग बप्पा यांचे कुणबी जातीचे काढलेले प्रमाणपत्र पालक मंत्र्यांनी भर सभेत फडकावून दाखविण्याची आवश्यकता नव्हती. कारण ते सर्व कुणबी मराठा जात प्रमाणपत्र हे ऑनलाईन असल्याने सर्वांना पाहण्यासाठी खुले आहे. राज्याचे कृषिमंत्री म्हणून पालकमंत्री काय काम केलं ? याची माहिती त्यांनी द्यायला हवी. कांदा अनुदान, सन २०२० चा पीकविमा, कापूस, सोयाबीन, तूर व हरबरा या पिकांना भाव नाही. मात्र खासदारांनी संसदेत या बाबत कधीच तोंड उघडले नाही. त्यांना कुणीच संसदेत बोलताना नव्हे तर निवडणुकीत मते मागण्यासाठी आणि जिंकल्या नंतरही कोणत्या गावात गेल्याचे कुणी पाहिलेले नाही. भाजपच्या उमेदवार आणि पालकमंत्री यांचे जलजीवन मिशन आणि रस्त्याच्या काम करणारे ठेकेदार यांच्याशी अर्थपूर्ण सबंध असल्यानेच त्या योजने संबंधी बोलत नाहीत की काय? असा प्रश्न उपस्थित केला. तसेच बहुरंगी म्हणणाऱ्या पालक मंत्र्यांना उत्तर देताना कुणाचा बहुरंगीपना उभ्या महाराष्ट्राला ठाऊक आहे. असे म्हणून मी रंगात रंग मिसळणार बजरंग आहे. असे म्हणाले.

तसेच पालकमंत्री महोदय हे अशा प्रकारचे वक्तव्य करून ते स्वतःच त्यांच्या उमेदवाराला पराभूत करण्याची त्यांनाच घाई झालेली आहे. असे म्हणाले.

# विजय स्पोर्ट्स अकॅडमीचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२ एप्रिल**

केज येथे विजय स्पोर्ट्स अकॅडमीचे वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या शिबिराचे उद्घाटन स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज या मैदान वर संपन्न झाले या कार्यक्रमाला अध्यक्ष श्री.भोसले सर रोटरी क्लब केज उपस्थितीत होते प्रमुख उद्घाटक श्री. बेडसकर साहेब गटशिक्षणाधिकारी केज यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती प्राचार्य.श्री.कोकिळ सर, प्रा. हनुमंत सौदागर सर, श्री. नेहरकर सर, श्री.अजय भांगे सर, श्री.अशोक गायकवाड श्री. ठोंबरे सर, श्री राऊत सर श्री. तोंडसे सर, श्री.नेमटे सर, श्री.मुंडे सर, सौ. गुंड मॅडम होती या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड क्रीडा संयोजक केज यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गिरी सर यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार श्री मुंडे सर यांनी केले आहे या कार्यक्रमाला केज तालुक्यातील विविध शाळेतील खेळाडूंची व क्रीडा शिक्षकाची उपस्थिती होती.



# पंकजाताई मुंडे यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचा मुस्लिम बांधवांचा निर्धार



**तभा वृत्तसेवा**
**तेलगाव दि.२ एप्रिल**

लोकनेते मुंडे साहेबांना मुस्लिम बांधवांनी नेहमीच साथ दिली आहे, तशीच साथ मलाही मिळत आहे. विरोधक भूलथापा मारुन मुस्लिम बांधवांना भाजपच्या विरोधात घाबरवतात पण त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. तुमच्या केसालाही धक्का लागला तर सर्वात अगोदर मी पुढे येईल. काळजी करू नका, तुमचा विकासच तर मी करेनच पण तुमचे संरक्षणही करण्याची जबाबदारी मी घेते असा विश्वास भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी येथे बोलतांना दिला.

पंकजाताई मुंडे यांनी आज दिंद्रुड व तेलगाव येथे मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला. दिंद्रुड येथे ईद ए-मिलाद कार्यक्रमात मुस्लिम बांधवांना त्यांनी मनमोकळा संवाद साधत शुभेच्छा दिल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी आ. प्रकाश सोळंके, मोहनराव जगताप, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबूराव पोटभरे, ज्येष्ठ नेते राजाभाऊ मुंडे, मौलाना फारूक, शेख अखिल, चांदभाई, शिवाजी बडे, नईम शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, माझ्यावर विश्वास ठेवा, कारण माझ्या नावापुढे गोपीनाथ मुंडेंचे नाव लागले आहे. मी सर्व जाती धर्मावर नेतृत्वाची सावली होईन, त्यामुळे तुमची लेक म्हणून मला मतांची ओटी भरा. माझा विजय म्हणजे तुमचा विजय आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे म्हणून या निवडणूकीत सन्मानाचा विजय मिळवून देण्यासाठी भरघोस मतांनी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करा. मी मंत्री असताना केलेला विकास तुम्ही प्रत्यक्ष डोळ्याने पाहिला आहे. माझ्याविषयी कुणाच्या मनात राग लोभ नाही. भविष्याचा विचार करा मला पाच वर्षे द्या. रोजगार, उद्योगासह पाणी प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबध्द राहील. सर्वांचा समान विकास करेन. देशात पुन्हा एकदा मोदी सरकार विराजमान होणार आहे. अशावेळी या भव्य विजयात आपलाही हिस्सा असावा यासाठी मला संधी द्या. मी कायम विकासासोबत आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे. अल्पसंख्याकांवर अन्याय होत असेल तर मी तुमच्या हक्कासाठी अगोदर पुढे येईल.मी मायनॉरिटी आहे पण काम मेजॉरिटीचे करते असं त्या म्हणाल्या.

# यावेळेस तुतारी वाजवावीच लागेल-आ.संदीप क्षीरसागर

## लिंबागणेश, मांजरसुंबा गणात कॉर्नर सभा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**



लोकशाही वाचविण्यासाठी आणि आपले प्रश्न मार्गी लावून घेण्यासाठी यावेळेस तुतारी वाजवावीच लागणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी लिंबागणेश व मांजरसुबा पंचायत समिती गणातील गावांत झालेल्या कॉर्नर सभेत सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी आ.संदीप क्षीरसागर बीड मतदारसंघ पिंजून काढत आहेत. मंगळवार (दि.३०) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी लिंबागणेश आणि मांजरसुंबा पंचायत गणातील गावांमध्ये कॉर्नर सभा घेतल्या. यावेळी बजरंग सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करून लोकशाही रक्षणासाठी आपले योगदान द्यावे लागेल. आपले विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी यावेळेस तुतारी वाजवावीच लागेल असे मत यावेळी आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केले. या बैठकींसाठी महाविकास आघाडीतील घटकपक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरासमोर रांगोळीतून तुतारी रेखाटत महिलांकडून बजरंग बप्पा सोनवणेंचे स्वागत

## गेवराई तालुक्यात महिलांचा असा ही प्रचार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२ एप्रिल**

गेवराई तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांना चांगली पसंती मिळाली आहे. गावा - गावात बैलगाडीतून, दुचाकीवरून रॅली काढून तर उघड्या जीपमधून मिरवणूक काढून त्यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजवून स्वागत होत असताना आता सर्व सामान्य महिला घरासमोर रांगोळीतून तुतारी हे चिन्ह रेखाटून बजरंग बप्पांचा प्रचार करताना दिसून येत आहे.

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्यासह यांनी माजी मंत्री बदामराव पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, पंढरीनाथ लगड, युवा नेते युध्दजित पंडित, महेश बेदरे, अमोल करांडे, आबा दाभाडे यांच्यासह मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी गेवराई तालुका पिंजून काढून प्रचारात आघाडी घेतली आहे. कुठलाही राजकीय वारसा नसताना सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील उमेदवार म्हणून बजरंग बप्पा सोनवणे यांना पसंती मिळत आहे.

बजरंग बप्पा सोनवणे यांची मराठा, धनगर, मुस्लिम आरक्षणासह संविधान वाचविण्याची भूमिका, प्रत्येक तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी




नवीन प्रकल्प आणणे, रेल्वे मार्गाचे काम पूर्ण करणे ही कामे प्राधान्याने करण्याचे त्यांचे धोरण, कांदा, कापूस, सोयाबीन, तूर, हरबरा या पिकांवरील निर्यातबंदी उठवून शेतकऱ्यांना हमीभाव व शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी आवाज उठवून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडविणे हा त्यांचा ध्यास असल्याची भूमिका मतदारांसमोर मांडत आहेत. तर भाजपच्या विद्यमान खासदार, माजी पालकमंत्री व विद्यमान पालकमंत्री यांनी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी दूरदृष्टी ठेवून कुठल्याही प्रकारचे प्रकल्प न आणल्याने तरुणांची बेरोजगारी वाढली असून विकास निधी खर्च न केल्याने अनेक विकास कामे प्रलंबित राहिल्याचे मतदारांसमोर मांडत आहेत. विरोधी मुंडे भाऊ - बहिणी या त्यांच्या स्वार्थासाठी जिल्ह्यात जातीवादाचे विषवल्ली पेरून मते कशी मिळविता येतील. यासाठी धडपड करीत असल्याचे लोकांना प्रचारातून पटवून देत आहेत. त्यामुळे गेवराई तालुक्यातील सर्व समाजातील मतदारांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळत असून प्रचारासाठी दाखल होताच बैलगाडीतून, दुचाकीवरून रॅली काढून तर उघड्या जीपमधून मिरवणूक काढून त्यांचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजवून स्वागत करीत आहेत. तर आता सर्व सामान्य महिला या आपापल्या घरासमोर रांगोळीतून तुतारी चिन्ह व बजरंग बप्पा सोनवणे हे महाराष्ट्राच्या भविष्यासाठी एकमेव पर्याय असल्याचे रेखाटून बजरंग बप्पांचा असा प्रचार करू लागल्या आहेत.

राज्याच्या आणि देशाच्या विकासात शरदचंद्र पवार यांचा असलेला सिंहाचा वाटा, देशात सर्वांना समान संधी व समान न्याय मिळावा म्हणून काँग्रेस पक्षाची भूमिका तर राज्यात अडीच वर्षाच्या कार्यकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना सारख्या महामारीत हाताळलेला परिस्थिती. या गोष्टीचा विचार करीत इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी मतदार उभे राहून त्यांना समर्थन व पसंती देत असल्याचे चित्र गेवराई तालुक्यात दिसून येत आहे.

# स्था.गु.शा.बीड ने प्रतिबंधीत गुटख्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर छापा टाकुन दोन आरोपी विरुध्द केली कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

पोलीस अधीक्षक साहेब,बीड यांनी जिल्हयातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याबाबतची गोपनिय माहिती काढुन जास्तीत जास्त कारवाई करण्यासाठी स्था.गु.शा. पथकांना मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक ०१/०५/२०२४ रोजी पोउपनि खटावकर व स्टाफ हे पेट्रोलिंग करीत असतांना पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, इसम नामे शेख शोयेब शेख खमरोद्दीन रा.मोमीनपुरा बीड हा प्रतिबंधीत हिरा पान मसाला नावाचा गुटखा विक्री करण्याच्या इराद्याने महिंद्रा ढणत ३०० क्र.चक९९उत११३८ गाडीमध्ये घेवून बार्शीनाका वरुन इमामपुर रोडने जात आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सदरची माहिती पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. यांना कळवुन त्यांनी तात्काळ छापा कारवाई करण्याचे आदेश दिले. पोउपनि खटावकर व पथक तात्काळ बातमी ठिकाणी जावून अचानक छापा मारला असता महिंद्रा ढतण गाडीमध्ये एक इसम मिळुन आला तेव्हा त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख शोयेब शेख खमरोद्दीन वय २५ वर्षे रा.मोमीनपुरा बीड असे सांगितले व गाडीची तपासणी केली असता गाडीमध्ये १,१०,१६०/- रु चा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा मिळुन आला आहे. तसेच गुन्हयात वापरलेली महिंद्रा ढतण किंमत अंदाजे ५,००,०००/- रु ची असा एकुण ६,१०,१६०/- रु चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीस गुटखा व गाडी बद्दल अधिक विचारपुस केली असता त्याने सदर गाडी परशुराम मोहन गायकवाड रा.आकाशवाणी बीड याने आणली होती आणि गुटख्याचा माल हा दोघांचा असल्याचे सांगितले आहे. आरोपी नामे शेख शोयेब शेख खमरोद्दीन यास व जप्त केलेला प्रतिबंधीत गुटखा व गुन्हयात वापरलेले महिंद्रा टीव्हीयु वाहन पो.ठा.पेठ बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन दोन्ही आरोपीतां विरुध्द पो.ठा.पेठ बीड गुरनं ११४/२०२४ कलम ३२८,२७२,२७३,३४ भादंवि प्रमाणे दिनांक ०१/०५/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक आरोपी यास ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित एक आरोपीचा शोध घेणे चालु आहे.

सदरची कामगिरी ही मा. नंदकुमार ठाकुर पोलीस अधीक्षक बीड, मा.अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा,बीड येथील पोलीस निरीक्षक श्री.संतोष साबळे, पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/मनोज वाघ, पोह/प्रसाद कदम, पोना/विकास वाघमारे, देविदास जमदाडे, पोना/सोमनाथ गायकवाड, पोशि/सचिन आंधळे,विकी सुरवसे व चालक/सुनिल राठोड यांनी केलेली आहे.

# सर्व मतदारांनी : मी मतदान करणार प्रतिज्ञा प्रमाणपत्र प्राप्त करा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ एप्रिल**

'मी मतदान करणार' असे प्रतिज्ञा प्रमाणपत्र प्राप्त करण्याची संधी सर्व मतदारांना प्राप्त करण्याची तयारी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केली आहे. याचा लाभ मतदारांनी उचलावा असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाकडून

१) https://forms.gle/rCWv3M3Q1q8akfjn8

२) https://forms.gle/w-gnuM-rTn1YFRxz7 अशा दोन लिंक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

२८ एप्रिल रविवार रोजी सायकल रॅलीच्या समापनाच्या वेळी 'मी मतदान करणार' असे प्रतिज्ञा प्रमाणपत्र करण्याची विशेष उपक्रमाच्या लिंक चे उद्‌घाटन जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. या लिंक ला प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने दैनिक मर्यादा लवकरच संपत होती त्यामुळे आपण आणखी पर्यायी एक लिंक उपलब्ध करून दिलेली आहे.




त्या माध्यमातून आपल्या मेलवर प्रमाणपत्र मिळेल.लिंक मध्ये ईमेल आयडी अचूक भरावा म्हणजे आपल्या ईमेल आयडीवर आपले प्रमाणपत्र प्राप्त होईल. जर दोन्ही लिंक ओपन झाल्या नाही तर दुसऱ्या दिवशी दोन्ही पैकी एका लिंक वर आपली माहिती भरावी व प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे आणि हे प्रमाणपत्र डाऊनलोड करून घ्यावे व आपल्या व्हाट्सअप स्टेटसला व सोशल मीडियावर ठेवावे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचेहस्ते मुख्य ध्वजारोहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

विकासाकडे झेपावणारा आपला हिंगोली जिल्हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करीत आहे. जिल्ह्याची चौफेर प्रगती व्हावी यासाठी जागरुक नागरिक म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करु या, असे प्रतिपादन राज्याचे अल्पसंख्याक विकास, औकाफ व पणन मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.



येथील संत नामदेव कवायत मैदानावर पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वज-ारोहण कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, राज्य राखीव पोलीस बलाच्या समादेशक पोर्णिमा गायकवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत कुंभार, गणेश वाघ, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पालकमंत्री श्री. अब्दुल सत्तार म्हणाले, महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी योगदान व बलिदान देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात, महान विभूतींना मी सर्वप्रथम अभिवादन करतो. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेंव्हा पासूनच राज्याने सर्वच क्षेत्रामध्ये विकासाची मोठी भरारी घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्याचबरोबर राजकीय, सामाजिक, साहित्य-संस्कृती या क्षेत्रातही अभूतपूर्व प्रगती करीत देशाच्या विकासामध्ये नेहमीच सिंहाचा वाटा उचलला आहे. त्यामुळेच आज आपले राज्य देशा-तील अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. आज आपण आंतरराष्ट्रीय कामगार दिन ही साजरा करीत असून, देशाला प्रगतीपथावर आणण्यामध्ये कामगार बांधवांचा महत्वाचा वाटा आहे.

सध्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारा आपला हिंग-ोली जिल्हा दिनांक १ मे, १९९९ रोजी निर्माण झाला. आज आपल्या जिल्ह्याच्या स्थापनेचा देखील वर्धापन दिन आहे. विकासाकडे झेपावणारा आपला हिंगोली जिल्हा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती करीत आहे, असे सांगून महाराष्ट्र राज्याचा ६४ वा वर्धापन दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त आज येथे जमलेल्या ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, खासदार-आमदार, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, कामगार बंधू, विद्यार्थी, आणि पत्रकार यांना पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पंडीत अवचार यांनी केले. यावेळी पोलीस, राज्य राखीव दल, होमगार्ड पथक तसेच बँक पथकाने परेडचे शानदार संचालन केले. याप्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नितीन तडस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मुणगल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कैलास शेळके, जिल्हा अध-ीक्षक कृषि अधिकारी डॉ.राजेंद्र कदम यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निवडणुकीच्या कामात गैरहजर राहणाऱ्या प्राचार्याविरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

कळमनुरी विधानसभा मतदार संघात लोकसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्यानंतरही गैरहजर राहणाऱ्या सेनगावच्या तोष्णीवाल महाविद्यालयाच्या प्राचार्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये कळमनुरी पोलिस ठाण्यात दि १ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली लोकसभा मतदार संघात निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षासह मतदान अधिकारी म्हणून कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यासाठी विधानसभा मतदार संघनिहाय नियुक्त्या करण्यात आल्या. एका विधानसभेतील नियुक्त केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी दुसऱ्या विधानसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी पाठविण्यात आले होते.

कळमन् नसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी सेनगावच्या तोष्णीवाल महाविद्यालयाचे प्राचार्य एस जी तळणीकर यांची मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यासाठी त्यांच्या नियुक्तीचे आदेश उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांचय स्वाक्षरीने पाठविण्यात आले होते. मात्र मतदान प्रक्रीयेपूर्वी असलेल्या प्रशिक्षणाला ते गैरहजर राहीले होते. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा मागविण्यात आला होता. प्राचार्य तळणीकर यांनी खुलासा सादर करतांना आपण महाविद्यालयाचे प्राचार्य असून सध्या महाविद्यालयीन कामकाज सुरू आहे. शिवाय परी-क्षा देखील असल्याचे कारण खुलाश्यात नमुद केले होते. सदर खुलास अमान्य करून त्यांना तातडीने मतदान केंद्राध्यक्ष म्हणून काम करण्याच्या सुचनाही देण्यात आल्या. मात्र ते कर्तव्यावर हजर झालेच नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, तह-सीलदार सुरेखा नांदे यांनी दिले. यावरून नायब तहसीलदार आनंद सुळे यांनी बुधवार दि १ मे रोजी कळमनुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी प्राचार्य तळणीकर यांच्याविरूध्द लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक मोहन भोसले, जमादार भडके पुढील तपास करीत आहेत.

**लाऊडस्पीकरवरून उपविभागीय अधिकाऱ्यांची पीसीआर काढण्याचा इशारा**

लोकसभा निवडणुकीच्या कामांसाठी कळमनुरी तहसील कार्यालयाच्या प्रांगणात केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांना मतदान केंद्रावर जाण्यापूर्वी निवडणुकीचे साहीत्य वाटप करण्यात येत होते. यावेळी काही कर्मचारी पुकार होऊनही मुद्दाम साहीत्य घेण्यास तसेच हजर राहण्यास टाळाटाळ करीत असल्याचे लक्षात आल्यानंतर उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांनी थेट लाऊडस्पीकरवरूनच अशा कर्मचाऱ्यांविरूध्द नियमाप्रमाणे गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे तसेच त्यांचे पीसीआर काढण्याचा इशारा वारंवार दिला.

# औंढा नागनाथ, कुरूंद्यात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहन





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २ मे**

महाराष्ट्र दिनानिमित्त औंढा नागनाथ येथील विविध कार्यालयात तसेच कुरूंदा येथे ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहन करण्यात आले.

औंढा नागनाथ येथील तहसील कार्यालयात आ. डॉ प्रज्ञा सातव यांचेहस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी तह-सीलदार हरीश गाडे, नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, पोनि गणेश राहीरे, सहायक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, नायब तहसी-लदार लता लाखाडे आदींची प्रमुख उप-स्थिती होती. येथील पोलिस ठाण्यात पोनि गणेश राहीरे यांचेहस्ते ध्वजारोहन करण्यात आले. गोळेगाव येथील कृषी अधिकारी कार्यालय, नगर पंचायत कार्यालयातही ध्वजारोहन करण्यात आले.

कुरूंदा येथील ग्रामपंचायतीमध्ये महाराष्ट्र दिनानिमित्त सरपंच राजेश इंगोले यांचेहस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी पवार, सदस्य गणेश वाटमे, डॉ बारे, लक्ष्मण महाजन, नारायण अवसरमल्ले आदींची उपस्थिती होती.



**हिंगोली- जलेश्वर तलावाचे सौंदर्यीकरण करण्यात येणार असून आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी जलेश्वर तलावातील गाळ उपसा करण्याचे आवाहन केल्यानंतर गुरूवारी शहरातील जलेश्वर तलाव परिसरात गाळ उपसा करण्यासाठी टीप्पर आणि ट्रॅक्टरने गाळ काढून शेतात नेतांना दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### आंबेडकर प्रेस कौन्सिलच्या अध्यक्षपदी रवि शिखरे, कार्याध्यक्षपदी सुधाकर वाढवे





हिंगोली- आंबेडकर कौन्सिलच्या जिल्हा अध्यक्षपदी रवी शिखरे पाटील तर कोषाध्यक्ष सुधाकर वाढवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती येथे आंबेडकर प्रेस कॉन्सिलचे संस्थापक अध्यक्ष रावण धाबे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक झाली. यावेळी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. रवी शिखरे यांची जिल्हा अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. सुधाकर वाढवे यांची संघटनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. संतोष जाधव यांची विभागीय मराठवाडा अध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष ॲड रावण धाबे यांनी निवडीबद्दल पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. यावेळी कपिल इंगोले, प्रकाश वाढे, गोविंद जाधव आदींची उपस्थिती होती.

### पोलिस कर्मचारी सुखदेव पहारे सेवानिवृत्त



हिंगोली- शहर पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी सुखदेव रामजी पहारे हे वयोमानानुसार दि ३० एप्रील रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर येथील शहर पोलिस ठाण्यात सपत्नीक सत्कार करण्यात आला. तब्बल ३१ वर्षे प्रदीर्घ सेवा त्यांनी दिली. यावेळी पोनि नरेंद्र पाडळकर, एपीआय बोधगिरे, सपोनि मोरे, मेत्रेकर, फिरोज, जमादार लेकुळे, संजय तोडेवाले, धामणे, मार्के, विकास सोनुने, लक्ष्मण नागापुरे, शाम राजुलवार आर्दीची उपस्थिती होती.

### जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहन

हिंगोली- जिल्हाधिकारी कार्यालयात आज महाराष्ट्र राज्याच्या ६४ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी बारी सिध्दीकी, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव, उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार नवनाथ वगवाड यांची उपस्थिती होती.

# हिंगोलीत नगर परिषदेकडून जेसीबीद्वारे अतिक्रमण काढण्यास सुरूवात







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

शहरात वाहतुकीस अडथळा ठरणारे तसेच वारंवार सांगूनही अतिक्रमण न काढणाऱ्या भागा-तील अतिक्रमणांवर गुरूवारी नगर परिषदेच्या पथकाने जेसीबी मशीनद्वारे अतिक्रमण काढण्यास सुरूवात केली असून जवळपास दीडशे अतिक्रमणे नगर पालिकेच्या पथकांनी काढली आहेत. यावेळी पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

शहरातील हरण चौक, इंदिरा चौक, मच्छी मार्केट, फुलमंडी या भागात अनेकांनी अतिक्रमण थाटले होते. यापुर्वी नगर परिषदेने संबंधितांना अतिक्रमण काढून घेण्यासाठी नोटीसा बजावल्या होत्या. या अतिक्रमणामुळे शहरा-तील भागात अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत होती. तसेच नागरिकांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नगर परिषदेने नोटीस दिल्यानंतर काही जणांनी आपले अतिक्रमण हटवले परंतु काही जणांनी अतिक्रमण न हटविल्यामुळे गुरूवारी मुख्याधिकारी अरविंद मुंढे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्या उप-स्थितीत जेसीबी द्वारे अतिक्रमण काढण्यास सुरूवात केली आहे.

शहरातील फुलमंडी भागात छोट्या गल्ल्यांमध्ये हॉटेलचालकांनी अतिक्रमण करून ही गल्ली अधिकच अरूंद केली होती. तसेच हरण चौक, इंदिरा चौकातही अतिक्रमण केल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता.

गुरूवारी नगर परिषदेचे शहर अभियंता रत्नाकर अडसिरे, स्वच्छता निरीक्षक बाळु बांगर तसेच कर्मचारी यांनी या मोहीमेत सहभाग घेत शहरा-तील अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण काढण्यास सुरूवात केली. यावेळी अतिक्रमण धारकांचे सामान ट्रॅक्टरमधून घेऊन जप्त करण्यात आले. यावेळी मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# लोहरा खुर्द येथील जलजीवन मिशनच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २ मे**

तालुक्यातील मौजे लोहरा खुर्द येथे जलजीवन मिशन अतंर्गत झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची व अंदाजपत्रकानुसार होत नसल्याची तक्रार कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जलजीवन योजना यांचेकडे करण्यात आला आहे.

सदर तक्रारीत मौजे लोहरा खुर्द येथील मीशन जलजीवन योजनेच्या माध्यमातून हर घर जल ही योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत होण-ारे सर्व कामे हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून टाकलेले पाईप व मुख्य जलवाहिनीसाठी टाकलेले पाईप हे आय एस आय प्रमाणीत नसुन हलक्या दर्जाचे पाईप लाईन टाकण्यात आली असून त्या जलवाहिनीसाठी केलेले खोदकाम अंदाजपत्रकानुसार न करता केवळ दिड ते दोन फुटांपर्यंत खोदकाम करून ही जलवाहिनी टाकली आहे. त्यामुळे सदरील कामाची चौकशी तात्काळ करून चांगली व दर्जेदार झाल्यास गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळेल व शासनाचा हेतू सफल होईल गुत्तेदार आणि ग्रामसेवक यांच्या मिलीभगत करून थातूरमातूर काम करण्यात आले असल्याचा ठपका तक्रारदार बाळू एकनाथ जाधव यांनी केली असून सदर कामाबाबत यापूर्वीही तक्रारदार यांनी तक्रार नोंदवली होती परंतु त्याकडे मिशन जलजी-वन योजनेच्याअधिकाऱ्याकडून दुर्लक्ष केल्या गेले व अद्यापर्यंत चौकशी करण्यात आली नाही दरम्यान या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून कार्यवाही करावी अन्यथा येत्या पंधरा दिवसात जिल्हा परिषदेसमोर आमरण उप-ोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर लो-हरा खुर्द येथील ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, जिल्ह्यात अनेक ठिकाणी जलजीवन मिशनअंतर्गत कामे सुरू आहेत. परंतु या योजनेबद्दल अनेक गावांमधून तक्रारी येत आहेत. गावकऱ्यांना घरापर्यंत नळाद्वारे शुध्द पाणी पुरविण्याचा उद्देश आहे परंतु गुत्तेदार आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी यांची मिलीभगत अनेक ठिकाणी दिसत असून याकडे प्रशासनाचे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# वसमत येथे महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २ मे**



वसमत येथील प्रशासकीय कार्यालयासह शाळा, महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहन करण्यात आले.

महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याचा निर्मिती दिवस म्हणून साजरा केला जातो. १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्व-ात आले. वसमत येथे ठीक ठिकाणी शासकीय कार्यालय तसेच शाळा व महाविद्यालयात ध्वजारोहण करून महाराष्ट्र राज्य स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. १ मे रोजी वसमत तहसील कार्यालय येथे तहसीलदार शारदा दळवी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला तर वसमत उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे आमदार राजू भैया नवघरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समिती येथे उपसभापती सचिन भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आ. राजू भैया नव-घरे, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तह-सीलदार शारदा दळवी, सर्व महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी सर्व राजकीय नेते मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र दिनानिमित्त विविध ठिकाणी ध्वजारोहन पार पडले.

# मोदींच्या नेतृत्वात भारताचा सुपर पॉवर म्हणून उदय -डॉ.भागवत कराड

# मुकुंदवाडीत ना.रावसाहेब दानवे यांच्या प्रचार कार्यालयाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

पूर्वी गरीब देश म्हणून ओळख असलेल्या भारतास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या सक्षम नेतृत्वातून अर्थव्यवस्थेला गती देत जगात दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आणले. वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून गोर-गरिबांचे जीवनमान उंचावण्यासह आर्थिक विकास दरात वृध्दी झाली. ज्यामुळे भारताचा सुपर पॉवर म्हणून उदय झाला असून महासत्तेकडे सुरू असलेली घौडदौड सुरू ठेवण्यासाठी कमळ निशाणी समोर मतदान करून ना. रावसाहेब दानवे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री ना.डॉ. भागवत कराड यांनी केले.



जालना लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या मुकुंदवाडी मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे धुमधडाक्यात उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त झालेल्या प्रचार सभेत ना. डॉ.भागवत कराड बोलत होते. गृहनिर्माण मंत्री ना.अतुल सावे, आ. हरिभाऊ बागडे,भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर, जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ ,विजय औताडे, भगवान घडामोडे ,राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील,शहराध्यक्ष अभिजीत देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश पवार, मनसेचे सुमीत खांबेकर, डॉ. बाळासाहेब पवार, राजू शिंदे, शालिनी बुंधे,बाबुराव कदम ,दौलत खरात, , प्रमोद राठोड, शिवाजी दांडगे, सजन बागल, राधाकिसन पठाडे, रवी कवाडे, अनुराधा चव्हाण, श्रीराम शेळके, रामेश्वर भादवे, गणेश दहीहंडे, सरसाबाई वाघ, संजय चौधरी, सुनील नाडे ,रामचंद्र नरोटे, सुनील जगताप, दीपक खोतकर, भाऊराव देशमुख, जालिंदर शेंगडे, प्रदीप पाटील ,गणेश फुके, आदींची यावेळी उपस्थिती होती.

ना.डॉ. भागवत कराड म्हणाले, केंद्र सरकारने मागील दहा वर्षात अर्थकारणापासून अलिप्त असलेल्या मोठ्या समूहास जनधन,स्वनिधी, मुद्रा लोन, अशा योजनांद्वारे आर्थिक प्रवाहात आणले असून विकासासाठी ना. दानवे यांना विजयी करा असे आवाहन ना. डॉ. कराड यांनी केले.

ना. अतुल सावे यांनी काँग्रेसच्या साठ वर्षातील भ्रष्ट राजवटीचा खरपूस समाचार घेत काँग्रेसला सहा दशकात जे जमले नाही, ते मोदींनी अवघ्या दहा वर्षात करून दाखवले म्हणून भारत देशाला जगात मान असून ही प्रतिमा कायम ठेवण्यासाठी कमळ निशाणी समोर भरभरून मतदान करा असे आवाहन ना. सावे यांनी केले.

## काँग्रेसच्या पंतप्रधानपदाचा उमेदवार कोण? -ना.दानवे

“ गरिबांचा पंतप्रधान झाला हे काहींना सहन झाले नाही, म्हणून सगळ्यांना एकत्र करून पंतप्रधान नरेंद्र मोदींना हरवायचे आहे. मात्र जनतेची ताकद आणि विश्वास भरभक्कम असल्याने नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील, असा ठाम विश्वास व्यक्त करत काँग्रेसच्या पंतप्रधान पदाचा उमेदवार कोण? असा सवाल ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी यांनी यावेळी केला. तथापि आपल्या विकास कामांची दखल घेऊन जनतेने पुन्हा एकदा कमळ निशाणी समोर मतदान करावे, असे आवाहन ना. दानवे यांनी या प्रसंगी केले.

आ. हरिभाऊ बागडे म्हणाले की, छत्रपती संभाजी नगर ,जालना या दोन्ही जिल्ह्यांसह मराठवाड्यात रखडलेल्या विकास प्रकल्पांना ना. रावसाहेब पाटील दानवे यांनी चालना दिली असून विकासाची गंगा प्रवाही ठेवण्यासाठी ना. दानवे यांना मोठ्या मताधिक्यांनी विजयी करा असे आवाहन आ.बागडे यांनी केले.

यावेळी छगन भागवत, राहुल नरोटे, सिकंदर शेख,शेखर दांडगे, बळीराम कदम, अनिल शेजूळ, राजेश मीरकर, रामू शेळके, भाऊराव मुळे ,दीपक बनकर, मदनराव नवपुते ,भास्कर मुरमे, माधुरी अदवंत, मीरा चव्हाण यांच्या सह महायुतीतील घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला ,नागरीक व तरुणांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### देळेगव्हाण सातेफळ रस्त्याचे काम 'रामभरोसे' गुत्तेदाराची मनमानी



**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी/ प्रतिनिधी**

राजूर ते टेंभुर्णी राज्य महामार्गावरून देळेगव्हाण सातेफळ मार्गी विदर्भातील देराजा जोडण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून धीम्या गतीने काम सुरू असून ते पूर्णपणे निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचा आरोप देळेगव्हाण ,पोखरी ,सातेफळ आदि गावातील गावकऱ्यांनी केला आहे.

संबंधित रस्त्याच्या ठेकेदारानी देळेगव्हाण ते सातेफळ हद्दीतील शेतकऱ्यांच्या जमिनीही अधिग्रहहित केल्या असतांना राजकीय दबावापोटी अजूनही जास्त प्रमाणात अधिग्रहण करणे सुरू आहे.

नियमानुसार रस्त्याचे काम सुरू होण्यापूर्वी रस्त्याच्या कामाचे अंदाजे रक्कम व कुठल्या योजनेतून आहे हे फलक लावणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर काम सुरू असतांना अपघात टाळण्यासाठी सूचना फलक ,रेडीअम लावणे बंधनकारक आहे,परंतु संबधित गुत्तेदाराने सर्व नियम धाब्यावर बसवत मनमानी सुरू केली आहे. सध्या सातेफळ येथे रस्त्याचे काम सुरू असून त्या ठिकाणी मुरूम टाकण्याऐवजी रस्त्याच्या कडेला शेतकऱ्यांच्या शेतातील काळया मातीचा वापर सर्रासपणे सुरू असून संबधित काबरा नावाच्या अभियंत्याला मी अनेकवेळा संपर्क साधला असता अतिशय उर्मटपणे उत्तर मिळाले.

संबंधित ठेकेदार कुणालाही जुमानत नसून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रित करावे

### कराटे स्पर्धेत भोकरदन येथील कराटेपटूची दमदार कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

जळगाव येथे स्वयंम सिद्ध बहु उद्देशीय संस्था व फिट इंडिया तर्फे छत्रपति शिवाजी महाराज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये खेलो महाराष्ट्र खेलो राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत घेण्यात आली आहे. या स्पर्धेत भोकरदन येथील कराटेपटूची दमदार कामगिरी केली आहे, या स्पर्धाला राज्यातुन १९ जिल्हे सहभागी झाले होते. या स्पर्धेत शोतोकॉन कराटे व क्रीड़ा मंडळाचे विद्यार्थी सहभागी होऊन चमकदार कामगीरी केली.यात प्रिती रामा पवार (कांस्य पदक काथाकुमुते वैदही), सचिन क्षिरसागर (कांस्य पदक काथा कुमुते), शुभांगी शिवाजी आहेर कांस्य पदक काथा कुमुते, किरण राजेन्द्र ताटु (कांस्य पदक काथा कुमुते), तेजस्विनी अभिजीत भारती (कांस्य पदक काथा कुमुते) या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगीरी केला आहे. कराटे व एथलेटिक्स प्रशिक्षक अनिल पगारे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले आहे.

### भनंग जळगाव ग्रा.प.कार्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती भनंग जळगाव साजरी अंबड १ एप्रिल भनंग जळगाव येथे सरपंच उपसरपंच यांनी केली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी भनंग जळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालय मोठ्या थाटात जयंती साजरी करण्यात आली यावेळी सरपंच उपसरपंच. ग्रामपंचायत सदस्यग.गावातील सर्व मान्यवर उपस्थित होते .

## परतुरात मोंढ्यात भीषण आगीत जिओ फायबर चे कार्यालय भस्मसात ;६ लाखाचे नुकसान !

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / केदार शर्मा**

शहरातील मोंढा भागातील गजानन महाराज मंदिराजवळील माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांच्या व्यावसायिक कार्यालयाच्या इमारतीत असलेल्या जिओ फायबरच्या सर्विस कार्यालयात शॉर्टसर्किटने लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण कार्यालय भस्मसात झाले. यात अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे.

आज दुपारी साडेबारा वाजता जिओचे कर्मचारी कनेक्शन जोडणी साठी बाहेर गेलेले असताना अचानक कार्यालयाच्या बाहेर घट्ट काळा धूर निघत असल्याचे लोकांनी पाहताच आरडाओरड केली. वेळीच अग्निशमक दलाला सूचना देण्यात आली.

अग्निशमन दलाचे कर्मचारी व कामगार वेळीच घटनास्थळी पोहोचून आग विजवण्याचा प्रयत्न केला आग नेमके तळमाल्यावर आहे की वरच्या माळावर आहे हे समजत नसल्याने व आगीचे स्वरूप प्रचंड असल्याने आगीवर नियंत्रण



करण्यास बराच वेळ लागला. दरम्यान तळमजल्यावर असलेल्या कार्यालयाच्या आत असलेले फायबर केबल, रुटर बॉक्सेस, एस वन, एस टू बॉक्सेस, स्प्लेटिंग मशीन इत्यादी मूल्यवान साहित्य आगीच्या भक्षस्थानी गेल्याने आग अधिकच भडकलेली होती. आजूबाजूच्या शेजाऱ्यांनीही घाबरून घरातील सदस्यांना घराबाहेर काढले जेथलिया यांचे कार्यकर्ते सनी गायकवाड, मतीन कुरेशी व इतर कार्यकर्त्यांनी पाठीमागील बाजूस जाऊन दरवाजा तोडला असता खालच्या माळावर आग लागल्याचे निष्पन्न झाल्याने, त्या ठिकाणी आगीवर नियंत्रण मिळण्याचा प्रयत्न करण्यात आला. नवा मोंढा भागातील काही नागरिक व अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या शीताफिने सदरील आगीवर नियंत्रण केले दरम्यान जिओ फायबर च्या सर्विस कार्यालयातील सर्व मटेरियल जळून भस्मसात झालेले होते. उन्हाचा कडक पारा व आगीचे स्वरूप पाहून संपूर्ण मोंढा भागात भीतीचे वातावरण होते. आग इतरत्र पसरू नये यासाठी नागरिकांनी आपापल्या परीने प्रयत्न केले घटनास्थळी जागेचे मालक तथा माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया व नितीन जेथलिया हेही काही क्षणात त्या ठिकाणी पोहोचले होते. तासाभरातच आगीवर संपूर्णपणे नियंत्रण करण्यात आले सदरील आगीचे नेमके कारण कळू शकले नसले तरीही जिओ फायबरचे शेख अजहर यांनी सदरील आग शॉर्टसर्किटने लागली असावी असा अंदाज व्यक्त केला. पोलिसात या बाबत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## आधार अपडेशनसाठी ज्येष्ठांचे सेंटरवर हेलपाटे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

आधारकार्ड अपडेटसाठी जन्माचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला गाह्य धरला जात आहे. त्यामुळे सध्या आधारकार्ड अपडेटसाठी वयोवृद्धांच्या अडचणी वाढल्या आहेत. एकाच कामासाठी वृध्दांना आधार सेंटरवर वारंवार चकरा माराव्या लागत आहे. बहुतांश वृद्धांकडे जन्माचा दाखला नसल्याने डोकेदुखी वाढली आहे. - जन्माची नोंदच नसल्याने दाखले आणावे कुठून, असा प्रश्न पडला आहे. मात्र आता सर्वच स्तरावर आधार अपडेट शिवाय लाभ शासकीय योजनांचा घेण्यासाठी अडथळे येत आहे. मात्र अपडेट करताना कुठे अंगठा देखील येत नाही, तर कुठे जन्माच्या पुराव्या अभावी आधार अपडेट साठी अपडेट होत नाही, म्हणून आधारकार्ड वृद्धांनी वयाचा दाखला आणावा कुठून, असा प्रश्न पडला आहे. मतदानकार्ड पाठोपाठ आता आधारकार्ड हा भारतीय नागरिकत्वाचा महत्त्वाचा पुरावा मानला जातो. तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी व इतर अनेक ठिकाणी आधारकार्डची मागणी करण्यात येते. या शिवाय शासकीय योजनेत कोणतेच काम होत नाही. सध्या ग्रामीण भागातील वृद्धांना आधारकार्ड मधील दोष दूर करण्यासाठी बऱ्याच त्रुटींचा सामना करावा लागत आहे.

## भोकरदन येथे निवडणूक विभागातर्फे मतदार माहिती चिठठीचे केले वाटप

### सहा.निवडणूक नि.अधिकाऱ्यांनी घरी जाऊन मतदारांना दिले निमंत्रण

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

निवडणूक आयोगातर्फे मतदारांना मतदार माहिती चिठ्ठी अर्थात पोल चीट वाटप करण्यात आले,या मतदार चिठ्ठीमध्ये मतदाराचे नाव, परिसर, केंद्र कोणते, यादी क्रमांक, भाग क्रमांक, रुम क्रमांक इत्यादी आवश्यक माहिती आहे. जालना लोकसभा मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या आदेशानुसार मतदार चिठ्ठी वाटप गतीने सुरू असून याच अनुषंगाने आज दि. ३० एप्रिल रोजी सहाय्यक निवडणूक निर्णय



अधिकारी तथा उपविभागीय दंड अधिकारी दयानंद जगताप यांनी भोकरदन शहर व जोमाळा येथे काही मतदारांच्या घरी पोल चिठ्ठी पोहचवून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी भोकरदन चे तहसीलदार संतोष बनकर तसेच यादी भाग क्र. २०१ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी श्रीमती. एस.एच. लव्हाळे मुख्याध्यापिका, यादी भाग क्रमांक १९५ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घुलेकर यांची यावेळी उपस्थित होते.

## के.व्ही.फुके यांना सेवानिवृत्त बद्दल यथोचित सत्कार व गौरव

### मानव विकास मिशन अंतर्गत मोफत मुलींना सायकलीचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/ प्रतिनिधी**



भोकरदन तालुक्यातील श्री छत्रपती संभाजी विद्यालय तादुंळवाडीचे सह शिक्षक श्री के व्ही फुके हे १ मे ला वयानुरुप २८ वर्ष सेवा करून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या आज १मे महाराष्ट्र दिनी सपत्नीक संस्था व विद्यालयातर्फे यथोचित सत्कार व गौरव करण्यात आला त्यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्राचार्य संदीप साबळे,प्राचार्य संजय पैठणकर,माजी जि प सदस्य कडुबादादा खरात, संरपंच रामेश्वर चिकटे,माजी सरपंच विलास सावंत,जैनपुर कोठारा संरपंच दत्तु पाटील सोनवणे व सरकारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान महाराष्ट्र दिनानिमित्त के व्ही फुके याच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले तर विद्यालयातील वर्ग ८ वी च्या १२ मुलींना मानव विकास मिशन अंतर्गत मोफत सायकल चे वाटप करून वर्ग पाचवी ते नववी व ११ वी च्या कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा निकाल ही जाहीर करुन गुणपत्रकाचे वाटप ही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## जालना लोकसभा मतदारसंघात ६ मे पर्यंत वाटप होणार मतदार माहिती चिठ्ठी -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

### बीएलओ करणार मतदार माहिती चिठ्ठी वाटप

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना लोकसभा मतदारसंघातील जालना, बदनापूर, भोकरदन, सिल्लोड, फुलंब्री, पैठण या सहा विधानसभा मतदारसंघात दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या मतदार संघातील सर्व मतदारांना दि. ६ मे २०२४ पर्यंत मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरोघरी जाऊन ही मतदार माहिती चिठ्ठी वाटप करणार आहेत. आपणाकडे मतदान माहिती चिठ्ठी घेऊन येणाऱ्या बीएलओंना सहकार्य करावे, असेही आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

जालना लोकसभा मतदारसंघात एकूण २ हजार ६१ मतदान केंद्र असून १० लाख ३४ हजार एकशे ६ पुरुष मतदार, ९ लाख ३३ हजार ४१६ स्त्री मतदार, ५२ तृतीय पंथी मतदार असे एकूण १९ लाख ६७ हजार ५७४ मतदार आहेत. तर २ हजार ३७९ सैन्य दलातील मतदार आहेत. १८-जालना लोकसभा मतदारसंघात एकूण ६ विधानसभा मतदारसंघाचा समावेश होत असून २ हजार ६१ इतकी मतदान केंद्रे आहेत. त्या चा तपशील खालील प्रमाणे.

विधानसभा मतदार संघाचे नाव - १०१- जालना विधानसभा मतदारसंघ, मतदान केंद्राचा तपशील- शहरी-२२४, ग्रामीण-१०५, एकूण-३२९---१०२-बदनापुर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघ मतदान केंद्राचा तपशील- शहरी- ४१, ग्रामीण- ३१७ एकूण-३५८--- भोकरदन, विधानसभा मतदारसंघ- ३२, २९७, ३२९--- सिल्लोएड, विधानसभा मतदारसंघ- ५८, २९८, ३५६--- फुलंब्री, विधानसभा मतदारसंघ-९८, २५७, ३५५ पैठण,विधानसभा मतदारसंघ-३४, ३००,३३४--- एकुण- शहरी-४८७, ग्रामीण-१५७४,एकूण-२०६१.

मतदारसंघात एकूण मतदारांची संख्या० १९,६७,५७४ इतकी असून विधानसभा मतदारसंघ निहाय तपशील खालील प्रमाणे आहे.(दि. २५.४.२०२४नुसार)--- विधानसभा मतदार संघाचे नाव -जालना-पुरुष-१७३९७५, स्त्रीद-१५४२२२, इतर-३५, एकुण-३२८२३२, बदनापुर, (अ.जा.)- १६८३४०, १५३५४८, ५, ३२१८९३, भोकरदन-१६२९८७, १४९०३८, ०, ३१२०२५, सिल्लोरड- १७९०१७, १६०८२६, ४, ३३९८४७, फुलंब्री- १८४९८५, १६६८१९, ४, ३५१८०८, पैठण-१६४८०२, १४८९६३, ४, ३१३७६९, एकुण मतदार-१०३४१०६ ९३३४१६, ५२, एकूण- १९६७५७४. मतदारसंघात एकूण सैन्य८दलातील मतदारांची संख्याल २, ३७९ इतकी असून विधानसभा मतदारसंघ निहाय तपशील खालील प्रमाणे आहे. विधानसभा मतदार संघाचे नाव-जालना- पुरुष- ११३, स्त्री३-३, इतर - ०, एकुण- ११६, बदनापुर, (अ.जा.)- १८५, ५, ०, १९०, भोकरदन-९९०, २०, ०, १०१०, सिल्लो१ड - ५६३, १४, ०, ५७७, फुलंब्री- ३४२, १०, ०, ३५२, पैठण-१३४, ०, ०, १३४, एकुण मतदार-२३२७, ५२,०,२३७९. मतदारांना दिल्या जाणाऱ्या या मतदार माहिती चिठ्ठीमध्ये संबंधित मतदारांना त्यांचा मतदार यादी भाग क्रमांक, मतदार यादीतील अनुक्रमांक, मतदारांचे नाव,मतदार ओळखपत्र क्रमांक यासह मतदान केंद्राचा संपूर्ण पत्ता, मतदान केंद्र शोधण्यासाठी क्यु आर कोड, मतदानाचा दिनांकदिनांक व वेळ, जिओ टॅगचा मतदान केंद्राचा नकाशा यासह अन्य बाबींचा समावेश केलेला आहे. दि. २९ एप्रिल २०२४ ते ६ मे २०२४ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरोघरी जाऊन सदरील मतदार माहिती चिठ्ठी वाटप करणार आहेत. यावेळी बीएलओ यांच्याकडे बीएलओ रजिस्टर असणार असून यात मतदारांची मतदान चिठ्ठी प्राप्त झाल्याबद्दल स्वाक्षरी घेतली जाणार आहे. ज्या मतदारांना त्यांचे मतदान माहिती चिठ्ठी मिळाली नाही अशा मतदारांनी आपल्या यादी भागाच्या यांच्याशी संपर्क करावा. सर्व बीएलओंची यादी जालना जिल्हाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व मतदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, आपणाकडे मतदान माहिती चिठ्ठी घेऊन येणाऱ्या सर्व बीएलओंना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५ वा दिन उत्साहात साजरा; जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २ मे -**

महाराष्ट्र राष्ट्र स्थापनेच्या ६५ व्या दिनाचा मुख्य शासकीय समारोह मोठ्या उत्साहात वजीराबाद येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज पोलीस कवायत मैदानावर सकाळी ८ वाजता साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आले. त्यांनी समस्त जिल्हावाशियांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला विशेष पोलीस महानिरीक्षक शशिकांत महावरकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, श्रीमती किर्तीका अन्य वरिष्ठ अधिकारी आणि जेष्ठ सन्माननीय नागरिक तसेच स्वातंत्र सैनिक व त्यांचे कुटुंबियाची उपस्थिती होती.

ध्वजारोहण व ध्वजवंदनानंतर विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवड झालेला आदर्श तलाठी पुरस्कार उमाकांत दत्तराम भांगे यांना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व ५ हजार रुपयाचा धनादेश आणि प्रशस्तीपत्र देवून गौरव करण्यात आला. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे जिल्हा अग्निशामक दलाचे अधिकारी, कर्मचारी ज्ञानेश्वर सुर्यवंशी व निलेश निवृत्ती



काबंळे यांना उत्कृष्ठ कामगिरी केल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला.

जिल्हा पोलीस दलाच्या बँड पथकाने राष्ट्रगीतासह राज्यगीत सादर केले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना व राष्ट्रगीतानंतर जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी संचलन करणाऱ्या पथकाचे पोलीस वाहनातून निरीक्षक केले. परेड कमांडर संकेत सतीश गोसावी व सेकंड परेड कमांडर विजयकुमार धोंडगे यांच्या नेतृत्वाखाली पथसंचलनात केंद्रीय राखीव पोलीस दल, सशस्त्र पोलीस पथक, सशस्त्र महिला पोलीस पथक, दंगा नियंत्रण पथक, गृहरक्षक दलाचे पुरूष व महिला पथक, राष्ट्रीय छात्रसेना, पोलीस बॅन्ड पथक, डॉग स्काड, मार्क्स मॅन वाहन, बॉम्ब शोधक व नाशक पथक, वज्र वाहन, बुलेट रायडर, मिनी रेस्क्यू फायर टेंडर, अग्नीशामक वाहन, १०८ रुग्णवहिका यांचा पथसंचलनात सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले. तत्पूर्वी आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालय व मनपा आयुक्त कार्यालयात आज ध्वजारोहण संपन्न झाले.

तसेच पोलीस महासंचालक मुंबई यांच्याकडून जाहिर केलेले पुरस्कार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना आज सकाळी पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. दिलीप पुनमचंद जाधव, दहशतवाद विरोधी पथक नांदेड, पंढरीनाथ मुदीराज, वाचक शाखा, विक्रम बालाजीराव वाकडे, ग्रामीण पोलीस स्टेशन, संतोष विश्वनाथ सोनसळे, पोलीस मुख्यालय नांदेड, मो. असलम मो. हनिफ, एटीबी नांदेड, सिद्धार्थ पुरभाजी हटकर, नागरी हक्क संरक्षण नांदेड, दिनेश पारप्पा वसमतकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, २ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी प्रथम पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. आणि त्यानंतर त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्त कुलगुरूंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



कुलगुरू म्हणाले की, हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे नेतृत्व केलेल्या स्वामी रामानंद तीर्थ यांचे नावाने स्थापन झालेल्या या विद्यापीठाने सांस्कृतिक, क्रीडा व संशोधनाच्या क्षेत्रात देशपातळीवर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला आहे. १०५ हुतात्म्यांच्या बलिदानातून स्थापन झालेल्या महाराष्ट्राला छत्रपती शिवराय, महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभला. सामुहिक प्रयत्नातूनच विकास होत असतो. पायाभूत सुविधा महत्वाच्या असतात पण त्याहून अधिक शैक्षणिक आणि संशोधनावर भर दिला पाहिजे, विद्यार्थ्यांना काळानुसार कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विद्यापीठ हे सर्वार्थाने पुढे नेण्यासाठी सहकार्य आणि प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रा. डॉ. शशिकांत ढवळे व रामेश्वर एम. आरदड यांनी लिखित केलेल्या 'फार्मासुटिकल ऑरगॉनिक केमिस्ट्री-ख' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. दिगंबर नेटके, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्यापरिषद सदस्य, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. पराग खडके, वित्त व लेखाधिकारी महमद शकील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. मनोज रेड्डी, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनायक जाधव, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदिश कुलकर्णी यांच्या समवेत विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### मासिक शिबिराच्या तारखेत बदल

**नांदेड -** प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने मुदखेड तालुक्याच्या ठिकाणी १५ मे २०२४ रोजी मासिक शिबिर घेण्याचे नियोजन होते. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे हे शिबिर १४ मे २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. तरी सर्वांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### नीट परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड -** नीट परीक्षा २०२४ ही रविवार ५ मे २०२४ रोजी दुपारी २ ते संध्याकाळी ५.२० या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील एकूण ५६ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्रावर २२ हजार २७९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. या परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात रविवार ५ मे २०२४ रोजी १२ वाजेपासून ते सांयकाळी ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच यावेळेत परीक्षा केंद्राच्या परिसरातील शंभर मीटर पर्यंतच्या सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध राहील, असे जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी कळविले आहे.

### तुप्पा येथे भीम जयंती उत्साहात साजरी

**नवीन नांदेड -** तुप्पा येथील भीम जयंती मंडळाच्या वतीने ३० एप्रिल रोजी महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी



जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली असून यानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. तुप्पा येथील भीम जयंती मंडळाच्या वतीने मंगळवार सकाळी विहाराच्या प्रांगणात राज्य राखीव पोलीस दलातील जवान सुभाष पंडित व शरद पंडित यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. दरम्यान पत्रकार दत्ता हरी धोत्रे, राम तरटे, काकासाहेब डावरे व श्याम निलंगेकर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी माजी ग्रामपंचायत सदस्य कानोबा पंडित, रवीकुमार पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक माजी ग्रामपंचायत सदस्य रवी पंडित यांनी केले. सूत्रसंचालन अरुण पंडित यांनी तर प्रवीण ढोईबळे यांनी आभार मानले. जयंतीच्या यशस्वीतेसाठी भीम जयंती मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष भूषण पंडित, अमित पंडित व त्यांचे सहकारी पदाधिकारी संजय ढोईबळे, पवन डोईबळे, नितीन ढोईबळे आदींनी परिश्रम घेतले. गौरव पंडित, भूषण पंडित, पवन ढोईबळे व मित्र मंडळाच्या वतीने अन्नदानाचे वाटप करण्यात आले. दुसऱ्या सत्रात दुपारी तथागत गौतम बुद्ध व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची गावातील प्रमुख रस्त्याने वाजत गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

### कामगारदिनी रक्तदान शिबिराला ऊस कामगारांचा प्रतिसाद



**तामसा -** हदगाव रस्त्यावरील सुभाष साखर कारखान्यात कामगार दिनानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला कामगार व कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद दिला. कारखान्याचे व्यवस्थापक राजेश मानधना यांच्या उपस्थितीत शिबिर झाले. यावेळी ३१ कामगार व कर्मचाऱ्यांनी रक्तदानाचे पवित्र राष्ट्रीय कर्तव्य केले. नांदेड येथील गुरु गोविंदसिंह शासकीय रक्तपेढीचे अधिकारी बालाप्रसाद भालेराव यांनी साखर कारखान्यावर कर्मचाऱ्यांच्या या उपक्रमाची कौतुक करीत आभार मानले. यावेळी रक्तपेढीचे अधिकारी बालाप्रसाद भालेराव,शेतकी अधिकारी किशोर वानखेडे, मुख्य अभियंता गीते, लेखाधिकारी अविनाश सूर्यवंशी, हेडे यांच्या हस्ते रक्तदात्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

### रंगभरण चित्रकला स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड -** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरातील देगाव चाळ परिसरातील प्रज्ञा करुणा विहार येथे रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना स्मृतिशेष पँथर सूर्यकांत ढवळे यांच्या स्मरणार्थ पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी येथील सुप्रसिध्द विचारवंत बालाजी थोटवे, साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे, कवी पांडुरंग कोकुलवार, आदर्श शिक्षिका पंचफुला वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते तथा संयोजक सुभाष लोखंड आदींची उपस्थिती होती.

## हक्कासाठी संघर्ष करण्याचा अधिकार बाबासाहेबांनी दिला : हरिभाऊ जोश

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, २ मे -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कमकुवत दुर्बल घटकांना आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्याचा अधिकार दिला असे मत हरिभाऊ जोशी महाराज यांनी व्यक्त केले.

मोजे बल्लाळ येथे दि.३०एप्रिल रोजी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती साजरी करण्यात आली सकाळी १० वाजता हरिभाऊ जोशी यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेण्यात आली प्रथम ग्रा.प.सदस्या निर्मलाताई बबीलवाड, मरिबा गाडेकर मा.सरपंच बालाजी पोकलवार यांचे हस्ते भगवान बुद्ध,डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना जोशी महाराज म्हणाले बाबासाहेबांनी त्याकाळी विषमते विरुद्ध संघर्ष केला मागास समाजातील उपेक्षित वंचित घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ओबीसी,एससी, एसटीना आरक्षण दिल शिका संघटित व्हा मगच संघर्ष करा असा संदेश बाबासाहेबांनी दिला. यावेळी बोलताना पोलीस पाटील बालाजी श्रीखंडे म्हणाले डॉ. आंबेडकर हे६४ विषयात परांगत होते त्यांनी३२ पदव्या मिळविल्या त्यांना अनेक भाषा येत असत बाबासाहेबांनी मनात आणले असते तर सर्वोच्च पदापर्यंत जावून खुप कमाई केली असती त्यांनी आपल्या कुटूंबाचा विचार न करता दिन दुबळ्या करिता आणि देशासाठी देह झिजवला.

ज्येष्ठ पत्रकार एल.ए.हिरे म्हणाले शाळेच्या बाहेर राहुन शिक्षण घेणाऱ्या बाबासाहेबांना रमाईची साथ होती. देशाचा संविधान लिहिताना बाबासाहेबांना खूप अडथळे आले देशात अनेक जाती धर्म असतांना संविधान लिहिने जिकरीचे होते छ.शिवाजी महाराज, संत तुकाराम,संत कबीर, महात्मा फुले, शाहू महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून उत्कृष्ठ संविधान लिहिलं आंबेडकरवादी म्हणून घेणाऱ्यांनी बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालतो का याचा विचार करावा इतरांना नावे ठेवण्यापेक्षा जयंती साजरी करतांना लोकांनी नावे ठेवू नयेत असे वागले पाहिजे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भागाजी जाधव यांनी केले.सांयकाळी पाच वाजता आंबेडकर यांच्यातील चित्रासह गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली जयंतीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष अंगुलीमाल हिरे,उपाध्यक्ष प्रमोद जाधव, साईकिरण हिरे, रवी हिरे, सुर्यकांत जाधव, सिद्धांत बाजेकर आदिनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्याभारतीच्या वतीने प्रांतस्तरीय आचार्य प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २ मे -**

विद्याभारती देवगिरी प्रांत शिक्षा संस्थानच्या वतीने दि.२ मे ते १२ मे २०२४ दरम्यान नांदेड येथे देवगिरी प्रांताचा आचार्य प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे. या दहा दिवसीय प्रशिक्षण वर्गादरम्यान दहा दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण आणि वैदिक गणित, संस्कृती ज्ञान परीक्षा, विमर्श या विषयांचे प्रत्येकी दोन दिवसीय मार्गदर्शन वर्गांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाड्यातील आठ आणि खानदेशातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव अशा आकरा जिल्ह्यातील शिक्षक या प्रशिक्षण वर्गात सहभागी होणार आहेत.

विष्णुपुरी नांदेड येथील इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, सहयोग कॅम्पस येथे हे प्रशिक्षण वर्ग २मे ते १२ मे २०२४ दरम्यान होणार आहेत. बालकांच्या समग्र विकासात जीवनाचा घनिष्ठ अनुभव, संस्कार, चरित्र निर्माण, क्षमतांचा विकास घडवून आणण्यासाठी शिक्षकांना (आचार्य) प्रशिक्षित करण्यासाठी विद्याभारती गेल्या २२ वर्षांपासून अशा प्रकारचे प्रशिक्षण वर्ग आयोजित करते. शिक्षक, प्राधानाचार्य, पालक व शिक्षण प्रक्रियेतील सर्व महत्वाच्या घटकांसाठी या प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात आले असून निवास व भोजनव्यवस्थेसह पूर्णवेळ स्वरुपाचे हे वर्ग आहेत.

बारा शैक्षणिक व्यवस्थेतील क्रियाकलापांव्दारे पंचकोषाधारित, अनुभवाधिष्ठित, आनंददायी, अनौपचारिक, शास्त्रशुद्ध शिक्षण पध्दती विद्याभारतीने विकसित केली आहे. वय वर्ष ०३ ते ०८ अर्थात शिशुवाटिका ते पहिली, दुसरी हा पायाभूत टप्पा समग्र विकासासाठी महत्त्वाचा आहे. तेव्हा या बालकांच्या वयोगटाला शिकविणारा आचार्य वर्गही तेवढाच उत्साही, तळमळीचा असावा लागतो. यासाठीच दरवर्षी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन देवगिरी प्रांतात केले जाते.

यासोबतच गणित विषय अधिकाधिक सोपा करून शिकविण्यासाठी विद्याभारतीने वर्गशः वैदिक गणिताचा अभ्यासक्रम तयार केला आहे. यातून गणिताचे उत्तर सोप्या पद्धीने काढण्याच्या क्लृप्त्या गणित शिक्षकाचा उत्साह नक्कीच वाढवतील. संस्कृती ज्ञान परीक्षा दरवर्षी विद्याभारती देवगिरी प्रांतातर्फे घेतली जाते ज्यातून भारतीय संस्कृती, ज्ञान विज्ञान, समृद्ध वारसा, जाज्वल्य इतिहास यांची ओळख होते.

या प्रशिक्षण वर्गाच्या व्यवस्थेची बैठक नुकतीच नांदेड येथे प्रांत सहमंत्री दिनेश देशपांडे यांच्या उपस्थितीत पार पडली. विद्याभारतीच्या श्रीमती वनमाला कुलकर्णी (प्रांत शिशु वाटिका प्रमुख), विजय (बाळूकाका) जोशी, रमेश मस्के, देवदत्त देशपांडे, सौ. कल्पना ना. कांबळे, आदित्य तुगनवार आदि या वर्गाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विश्व बंधुत्वाचा संदेश देणारे महान संत : गुणवंत मिसलवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २ मे -**

आपल्या महाराष्ट्र राज्याला संतांची खूप मोठी परंपरा असून, राष्ट्रीय संत तथा थोर स्वातंत्र्य सेनानी तुकडोजी महाराज यांनी खंजीरी भजनाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यासह देश- विदेशात सामाजिक प्रबोधन करुन विश्व बंधुत्वाचा संदेश देणारे महान संत म्हणजे तुकडोजी महाराज हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले.

ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. ३० एप्रिल २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता कवी, थोर स्वातंत्र्य सेनानी, समाजसुधारक, राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज यांची ११५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंती सोहळा अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी अध्यात्मिकतेबरोबरच १९४६ साली महात्मा गांधी, विनोबा भावे, डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडीत जवाहरलाल नेहरु, गुलझारीलाल नंदा, मौलाना आझाद यांच्यासमवेत भारत छोडो चले जाव चळवळीत सक्रीय सहभाग घेऊन भारत देश स्वातंत्र्यासाठी कार्य केले. त्यांना जेलही झाली. राष्ट्रपती भवनात स्वातंत्र्यानंतर भजन सादर करुन या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, कोणामध्येही मतभेद नसू दे हे काव्य सादर केले. याचवेळी देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत ही उपाधी दिली. अशा या महान संताच्या कार्याचा आणि विचारांचा तुम्ही- आम्ही आपण सर्वांनीच आदर्श घेऊन समाजाप्रती, देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले. सर्वप्रथम आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



नांदेड - शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्षा सौ संध्याताई बालाजीराव कल्याणकर यांच्या वतीने शिवालय उद्योग समूहाच्या वतीने आयोजित २१ जोडप्यांचा मरळक येथील श्री विमलेश्वर महादेव मंदिर प्रांगणात २१ जोडप्यांचा विवाह सोहळा पार पडला या कार्यक्रमात आमदार बालाजीराव कल्याणकर यांच्यासह उत्तर मतदारसंघ मोठ्या प्रमाणावर महिला व पुरुष उपस्थित होते. ( छाया- नरेंद्र गडप्पा, नांदेड)

## सीतानदीत पाणी सोडण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, २ मे -**

मुदखेड तालुक्यातील सीता नदी पात्रात ऊर्ध्व पैनगंगा कालव्याचे पाणी सोडण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत पाटील राजेगोरे यांच्या शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

सीता नदीच्या काठांवर असलेल्या भोसी, खरबी, पांढरवाडी आणि शेंबोली गावच्या परिसरातील जमिनीतील पाण्याची पातळी घटली आहे. त्यामुळे शेती आणि गुरेढोरे यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ऊर्ध्व पैनगंगा अंतर्गत कालव्यास दि. २ मे रोजी पाणी सोडले जाणार आहे. या कालव्याचे पाणी सीता नदी पात्रात सोडण्यात यावे जेणेकरून या भागातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. अशा प्रकारची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमंत पाटील राजेगोरे यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी जिल्हाधिकारी महेश वडदकर यांची भेट घेऊन जिल्ह्यातील पाणी टंचाई बाबत चर्चा केली. तसेच ग्रामीण भागातील गुरेढोरे यांच्यासाठी करावी लागणारी पाण्याची तजवीज याकडे राजेगोरे यांनी लक्ष वेधले. यावेळी बालाजी कल्याणकर, शिवानंद मुंडकर, गोविंदराव निनेवार, शिवदास चिंतले, सचिन खंदारे यांची उपस्थिती होती.

## कंधार शहरातील संभाजी नगरात मोकाट जनावरांचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, २ मे -**

शहरातील सभांजी नगर भागामध्ये कुत्रे डुक्कर व जनावरांनी मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे त्यामुळे रस्त्यावर चालताना असुरक्षितेचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री अपरात्री या मोकाट प्राण्यांपासून वाचण्यासाठी जीव मुठीत धरून रस्त्यावर चालावे लागत असल्याने पालिका प्रशासन या मोकाट प्राण्यांचा काही बंदोबस्त करतील का असा प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात आहे.

शहरातील संभाजी नगर भागात मोकाट कुत्रे ,डुकरे व जनावरांची एकूण संख्या किती याची कल्पना पालिका प्रशासनाला नाही शहरातील सर्व भागात या मोकाट प्राण्यांचा उपद्रव्य सुरू आहे रस्त्यावरून पायी चालणारे पदाचारी किंवा दुचाकीवरून जाणाऱ्यांवर दाबा धरून बसलेले कुत्रे अचानक हल्ला करतात वाहन चालकाने या अचानक झालेल्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी वाहनाचा वेग वाढविला तर त्यापेक्षा दुप्पट वेगाने कुत्रे पळत सुटतात त्यातच दुचाकी चालकांचा वाहनावरील ताबा सुटून वाहन घसरते व अपघात होतो या अपघातात रस्त्याने चालणाऱ्या निरपराध आबला वृद्धांवर जखमी होण्याची वेळ येते अनेक नागरिक व वाहनचालकांना याचा चांगलाच अनुभव आहे. कुत्र्यांच्या टोळक्यापासून पहाटे मॉर्निंग व शाळेसाठी घराबाहेर पडणाऱ्या लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांच्या सुरेक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील अनेक भागातील परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे येथे भटक्या कुत्र्यांचा व जनावरांचा हौदोस राजेरोसपणे पाहायला मिळतोय दिवसा आणि रात्री हे भटके कुत्रे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या अंगावर धावून जातात येथील नागरिकांचे म्हणणे आहे की, हातात दोन चाकी वहाणावरील पिशवी हिसकावून येत आहेत. मुख्य रस्त्यावरील शाळेच्या विद्यार्थ्यांना ये - जा करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे मोकाट प्राणी



धोकादायक बनले असल्याने पालक व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नगरपालिकेकडून या मोकाट प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.